# ON HINDU FESTIVALS.

A PRIZE ESSAY.

[Maráthí.]

---

# हिंदु लोकांच्या सणांविषयीं निबंध.

---

"तूं या गोष्टींपासून पळ आणि नीति, सुभक्ति, विश्वास, प्रीति, सहनता, लीनता, यांच्या मागें चाल."

---

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
1,500 Copies. A. D. 1853.

मुंबईमध्यें अमेरिकन मिशन छापखान्यांत छापिलें.

इ० स० १८५३.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| | पृष्ठ. |
| प्रस्तावना. . . . . . . . . . . . . . . . . . . . | ५ |
| उपोद्घात. . . . . . . . . . . . . . . . . . . . | ९ |
| चैत्र मास. . . . . . . . . . . . . . . . . . . . | १३ |
| वैशाख मास— अक्षतृतीया. . . . . . . . . . . . . . | १८ |
| जेष्ट मास— वटसावित्री. . . . . . . . . . . . . . | २१ |
| आशाढ व श्रावण मास— महाएकादशी, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, व गोकुळ अष्टमी. . . . . . . . . . | २४ |
| भाद्रपद मास— गणेश चतुर्थी. . . . . . . . . . . . | ३३ |
| आश्वीन मास— दसरा व दिवाळी. . . . . . . . . . | ३८ |
| फाल्गुन मास— होळी. . . . . . . . . . . . . . . | ४३ |
| साधारण विचार. . . . . . . . . . . . . . . . . | ४८ |
| सारांश. . . . . . . . . . . . . . . . . . . . | ५८ |
| ग्रंथशेष. . . . . . . . . . . . . . . . . . . . | ७० |

## प्रस्तावना.

कोणत्याहि देशाची स्थिति सर्वकाळ एकसारिखी राहत नाहीं; जे अज्ञानांत असतात ते सुधारून नीट होतात, आणि जे सुधरलेले असतात ते विशेष ज्ञानी होतात. हा साधारण नियम आहे; परंतु सुधारलेल्या लोकांच्या स्थितीस अनेक प्रकारचीं भयें असतात. ते जर जपून चालले व नित्य नवे शोध व नवे विचार करून आपलें ज्ञान वृद्धिंगत करीत राहिले, तर त्यांचा उत्तरोत्तर विशेष उत्कर्ष होतो; परंतु जर ते लोक आळसाने व अभिमानाने निरुद्योगी व आपल्याच शाहणपणावर भरवसा ठेवून राहिले तर त्यांची अवस्था फार वाईट होती. ते दिवसानदिवस अज्ञानांत व दुराचरणांत बुडूं लागतात. पूर्वीचें त्यांचें विद्येचें तेज जाऊन त्यांवर अविद्येची छाया पडती; त्यांच्या ज्ञानसूर्याचा लोप होऊन त्यांवर अज्ञानाचा निबिड अंधकार पडतो व त्यांस गाढ निद्रा लागती. अशा अंधकारांत त्यांच्या देशांत सहस्रावधि भयंकर व दुष्ट घातुक पश्वादि प्राणी व राक्षसादि येऊन वस्ती करून देशाचा विध्वंस करूं लागतात, व तेथें मुळींच अंधकार त्यांत लोक निद्राग्रस्त तेव्हां त्यांचा बंदोबस्त कोण करितो? ज्याची हानि त्यास दिसत नाहीं, तो आपल्या शेजाऱ्याची खबर कोठून घेईल? याप्रमाणें त्यां एकवेळ सुधारलेल्या लोकांची अवस्था पहिल्यापेक्षां अधिक भयंकर होती, व तिजबराबर रानटी लोकांची स्थिति ताडून पाहिली असतां ती विशेष सुखकर वाटती.

लोकांच्या ह्या अवस्थेचीं उदाहरणें इतिहासावरून पुष्कळ सांपडतात. सर्व युरोपखंडाची अवस्था एक वेळ असी झाली होती; रोमन लोकांच्या जुन्या राजधानीचा नाश (इ० सन ४७६) झाल्यापासून त्या खंडावर जीं अज्ञानरूप अभ्रें हळू हळू येऊं लागलीं, तीं सुमारें इसवी सन एक हजाराव्या वर्षी इतकीं दाट

होऊन गेली कीं, त्या शतकास इतिहासकर्त्यांनी अंधकाराचें युग असें नांव दिल्हें आहे; आणि हा अंधकार इ० स० च्या १६ व्या शतकाच्या आरंभापर्यंत थोडाबहुत होताच होता. परंतु पुढें ईश्वरी कृपेनें ज्ञानसूर्य उदयातें पावून तेथें इतका प्रकाश पडला कीं, जे दुसऱ्या देशाचे लोक अंधारांत बसले आहेत त्यांचेंहि डोळे त्याच्या तेजानें दिपूं लागले आहेत. आतां, हा प्रकाश परदेशी लोकांविषयीं झाला, परंतु आह्मा हिंदु लोकांची अवस्था कसी आहे हें पाहिलें पाहिजे. या लोकांसहि आज सुमारें दोन हजार वर्षांपासून अज्ञानअंधकारांत गाढ निद्रा लागली आहे; तींतून कित्येक जण आतांसे जागृत होत आहेत, व आपल्या देशीं पूर्वीं अंधकाराच्या समयांत कोणकोणत्या राक्षसांनी व क्रूर पशूंनी येऊन वस्ती केली हें पाहून त्यांस बाहेर हांकून लावण्याचे प्रयत्न चालविले आहेत. त्या कामाकरितां कित्येक शूरांनी नवीन शस्त्रें तयार केलीं आहेत, तेणेंकरून त्यांनी त्या दुष्टांबराबर युद्ध चालविलें आहे, व ईश्वरसहायानें त्यांस पुष्कळ जय मिळून ते यशस्वी होतील.

आतां आजपर्यंत जीं शस्त्रें एथें तयार झालीं आहेत, त्यांचीं नावें व त्यांनी कोणत्या शत्रूंवर हल्ला केला हें सांगतों.

| **शस्त्र.** | **शत्रु.** |
| --- | --- |
| दारू पिणाऱ्यांस सुबोध. | दारू हा अट्टल चोर. |
| ऋणनिषेधक बोध. | ऋणाग्नी. |
| होळीविषयीं ग्रंथ. | होळिका राक्षसीण. |
| पुनर्विवाह प्रकरण. | पुनर्विवाहप्रतिबंधक दुष्ट चाल. |
| खोट्या शपथेविषयीं. | खोट्या शपथेचें माहापातक. |
| लांच न खाण्याविषयीं. | लांच घेण्याची दुष्ट चाल. |
| सत्यनिरूपण. | असत्य नामक राक्षस. |
| स्त्रीविद्याभ्यास. | स्त्रियांस अज्ञानांत ठेवण्याची समजूत. |
| शुचिर्भूतपणा. | मलीनता नामक अवदसा. |

याप्रमाणें स्वदेशीय लोकांनी आपल्या शत्रूंचा नाश करण्यास शस्त्रास्त्रें सिद्ध केलीं आहेत. यांशिवाय परदेशी परोपकारी जन

व सरकार, जे सुप्रयत्न करितात ते निराळेच आहेत. परंतु या युद्धसंग्रामांत एक विलक्षण चमत्कार नजरेस पडतो; तो असा कीं ज्यांच्या रक्षणार्थ व कल्याणार्थ हे सुज्ञ लोक श्रम घेतात, तेच ह्यांचा द्वेष व निंदा करितात. याचें कारण असें कीं, ज्या दुष्ट पशूंचा हे योद्धे नाश करूं पाहतात, ते पशू बहुतेकानी आपल्या घरीं जसी गाई ह्मैस पाळावी, तसे बाळगून ठेविले आहेत, व त्यांवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. दुसऱ्या कित्येकानी जे दुष्ट राक्षस आपल्या देशांत शिरले आहेत त्यांस आपले धनी करून आपण गुलामाप्रमाणें त्यांच्या स्वाधीन होऊन राहिले आहेत ह्मणून त्या राक्षसांचा नाश करायास कोणी उद्युक्त झाला असतां त्यांस मोठा क्रोध येतो. असो, जरी आपल्या लोकांपासून द्वेष व छळणूक सोसणें प्राप्त पडलें, तरी आपलें कर्त्तव्यकर्म आपण सोडूं नये, ह्मणजे ते लवकरच शुद्धीवर येऊन उलटें आपलें सहाय करूं लागतील. आतां आपली शक्ति थोडी ह्मणून उगेच बसूं नये; प्रयत्न करावा. मुंगी हा लहान जीव असतां त्यांचा मोठा समुदाय मिळाला ह्मणजे मोठ्या सर्पासहि त्या जर्जर करून टाकितात. याप्रमाणें आपल्या अल्प सामर्थ्याचा खेद न करितां पुष्कळ मित्र जमवून उद्योग करून परमेश्वरापासीं सहाय मागावें या प्रकारचा विचार मनांत आणून मी यथामति हिंदुलोकांच्या सणांविषयीं हा निबंध रचिला आहे. तर यांतील दूषणांकडे लक्ष न देतां सुज्ञानी गुण मात्र ग्रहण करावे असी माझी प्रार्थना आहे.

# हिंदु लोकांचे सण.

## पत्र १लें.

### उपोद्घात.

मित्रबंधु राजमान्य राजश्री ———— यांसीं ———— विनंती. एथील क्षेमतागाईत फाल्गुन वद्य ८मी सोमवार पावेतों भगवंताच्या आशिर्वादेंकरून सुखरूप असों; विशेष, आपला माझा वियोग होऊन बहुत दिवस झाले, तेणेंकरून पूर्वीं आपण एकत्र असतांना ज्या मनोरंजक व उपयुक्त विषयांवर संभाषण केल्याने परस्परांस जसा आनंद व लाभ होत असे, तसा आतां आपल्या वियोगामुळें होत नाहीं. तथापि आपण मजपासून बहुत दूर आहां, असें नाहीं. ईश्वरकृपेने इंग्लिश लोकांचें राज्य या मुलखीं झाल्यामुळें जे अनेक लाभ झाले आहेत, त्यांपैकीं डांकेच्या कारखान्यापासून रयतेस मोठा फायदा आहे. आपणास कोठेंहि लंकेंत पत्र पाठविणें झालें, तरी अल्प काळांत व स्वल्प अर्थांत निर्धोक जाऊन पोहंचतें; तेणेंकरून आपला मित्र दूर असला तरी जवळच होतो व पत्रद्वारें त्याजबराबर बोलतां येतें. तर याच साधनाने मी आपणासीं संबंध ठेवीत जाईन; आणि पूर्वीं जसें आपलें संभाषण चालत असे, तसें आतांहि चालू होईल. मागल्या वर्षीं आपण स्त्रीशिक्षण प्रकाराविषयीं समक्ष बोलत होतों, तेव्हां आपलें मत प्रथम माझ्यासीं अगदीं विरुद्ध होतें: परंतु पुष्कळ वादविवाद हो-

ऊन स्त्रियांस विद्या शिकविल्याने जे लाभ होतात, त्यांची क्षि सप्रमाण उदाहरणें दाखविल्यावरून आपण सत्पक्षास मिळालेत; तेणेकरून मला जो अनिर्वचनीय लाभ झाला तो मी कधीं विसरणार नाहीं.

आतां आपणास माहित असेलच कीं, कोणत्याहि देशांतील लोक अद्यापि सुधारणुकेच्या कळसास येऊन पोंहंचले नाहींत कोणी कोणी तिच्या मध्यास कोणी त्याच्या वर असे आहेत. परंतु बहुतेक जण खालच्या पायरीवरच आहेत. आणि त्याप्रमाणें आपला देशहि अद्याप अज्ञानामुळें वर चढला नाहीं. परंतु आपल्या सभोंवतालच्या देशापेक्षां ह्मणजे **इराण, अर्बस्थान, तुर्कस्थान, ब्रह्मदेश** इत्यादिकांपेक्षां चांगल्या स्थितींत असून आपणास वर चढविणारे गुरू चांगले मिळाले आहेत. तर अशा संधीस आपण आळस सोडून प्रति दिवसीं एक एक पाऊल पुढें न टाकिलें तर पशूंची आणि आपली स्थिति बराबर होईल. यास्तव हा दोष न लावून घेतां स्वहितासाठीं आपण उत्तरोत्तर अधिक विचार करीत जावा, व आपणामध्यें जे दोष असतील, ते काढून टाकून जेणेंकरून देश सुखी होईल, ज्ञान वाढेल, लोक सदाचरणी व नीतिमान होतील व ते ईश्वराची सद्भीति धरितील व त्याचीच भक्ति करूं लागतील, असे उपाय अवश्य करूं लागावे. हा विचार मनांत आणून मी आपणास हिंदु लोकांच्या सणांविषयीं लिहिण्याचें योजिलें आहे. ह्या सणांपासून कोणते लाभ होतात किंवा हानि होती, याविषयीं आजपर्यंत आपल्यामध्यें कोणी शोध केला नाहीं.*

* होळीविषयीं मात्र दोन उत्तम ग्रंथ झाले आहेत.

याचें कारण असें कीं, सण व्रतें व उपवास, यांपासून आपलें वाईट होतें, असें कोणाच्याहि मनांत आलें नाहीं; परंतु जर ह्यांपासून वास्तविक हित होतें तर ते अवश्य पाळिले पाहिजेत; व जर अनहित होतें तर ते अवश्य त्यागिले पाहिजेत. याप्रमाणें कोणत्याहि रीतीनें पाहिलें असतां सणांविषयीं विचार करण्याचें मोठें अगत्य आहे. ह्मणून मी असा निश्चय केला आहे कीं आपणास दर एक पत्रीं एकएका महिन्यांतील सणावर विचार लिहून पाठवीन. सण व त्यासंबंधी कर्में एथें लिहिण्याची गरज नाहीं, ग्रंथाच्या शेवटीं शेषसंग्रहांत त्याचें वर्णन केलें आहे.

आतां ह्या पत्रीं सणांविषयीं साधारण विचार व कोणत्या स्वतःसिद्ध व्याख्येप्रमाणें सणाची परिक्षा करावी हें लिहितों.

आपला नित्याचा कामधंदा सोडून एकाद्या दिवशीं विश्रांती घेणें व मनास आल्हाद करणाऱ्या अशा व्यासंगानें रमविणें ही प्राचीन काळापासून बहुतकरून सर्व देशांतील लोकांची चाल होती; व जोंपर्यंत लोक चांगले सुधारले नव्हते, तोंपर्यंत त्यांमध्यें अशा प्रकारच्या कर्मणुकीचे दिवस पुष्कळ होते. विद्येच्या व्यासंगानें मनास जो अमूल्य लाभ व संतोष प्राप्त होतो, त्याविषयीं ते अज्ञात असतां आपल्या शरीराच्या वासना तृप्त करण्याकरितां दांडग्या खेळांत दिवस घालवीत; याप्रमाणें पृथ्वींतील लोकांच्या कित्येक सणांची उत्पत्ति असावी असें वाटतें.

२ परंतु ह्याशिवाय दुसरें एक कारण असें दिसतें कीं, वर्षाचे ऋतु पालटून नवें धान्य, नवीं फळें, नवी

हवा प्रारंभ होण्याचा काळ आला ह्मणजे आनंद करावा, असी मनुष्याच्या मनांत जी साहजिक इच्छा उत्पन्न होती, तिजपासून सण उत्पन्न होतात. शेतकरी, माळी, वाणी इत्यादि लोकांच्या उत्साहांच्या दिवसांच्या उत्पत्तीस हें कारण होय.

३ सण उत्पन्न होण्याचें तिसरें कारण असें आहे कीं, कित्येक देशांत मोठमोठे पराक्रमी महायोद्धे, स्वदेश-कल्याणकर्त्ते असे पुरूष उत्पन्न होऊन गेले, त्यांच्या स्मरणार्थ व बहुमानार्थ लोकानी त्यांच्या नावें सण स्थापिले.

४ सण चालू होण्याचें चौथें कारण असें आहे कीं धर्मसंबंधी गोष्टींत ईश्वराची भक्ति विशेष मन लावून करावी व त्याचें वैभव अधिक दिसावें किंवा एकाद्या वेळेस ईश्वरापासून आपणास अलौकिक रीतीने उपकार झाले, त्याचें स्मरण राहावें, ह्मणून सणाची स्थापना झाली. त्यांत कित्येक सण ईश्वरआज्ञापित आहेत व बहुतेक सण मनुष्याने आपल्या कल्पनेने चालू केले. जे ईश्वराने स्थापिले, ते सर्व देशांत नव्हते; कारण त्याची भक्ति चहुंकडे लोक करीत नसत. जे मनुष्यानी स्थापिले ते मात्र बहुतेकांस आवडले व बहुतानी त्यांचा स्वीकार केला.

व्रतें आणि उपवास ह्यांची उत्पत्ति धर्माच्या प्रकरणांत झाली आहे.

याप्रमाणें सणाच्या उत्पत्तीविषयीं कांहीं अनुमान व कांहीं प्रत्यक्ष प्रमाणें मिळतात. आतां सण कोणत्या प्रकारचे असावे व कोणत्या प्रकारचे नसावे हा दुसरा विचार आहे.

ज्या सणापासून घरांत ऋण व दरिद्र शिरतें व ज्या-

पासून शरिरास दुःख होतें, प्रकृति बिघडती, शारीरीं आळस येतो; तो सण कोणी कधीं पाळूं नये.

ज्या सणापासून मनास त्रास येतो, सदाचरणास कलंक लागतो, नीतीस भ्रष्टत्व येतें, अंतःकरण मलीन होतें, तो सण कधीं पाळूं नये.

ज्या सणापासून ईश्वराच्या आज्ञा मोडल्या जातात व लोक पूर्वीपेक्षां भ्रष्ट होऊन कुकर्म करायास तयार होतात तो सण कधीं पाळूं नये.

जो सण ईश्वरस्थापित आहे व ज्यापासून त्याचें गौरव दृष्टीस पडतें व ज्यापासून त्याच्यावर आपली भक्ति व श्रद्धा अधिक बसती; तो सण पाळावा.

या नियमांवर लक्ष ठेवून आपण हिंदूंच्या सणांविषयीं निष्पक्षपाताने विचार चालवूं; कळावें ही विनंती.

---

## पत्र २.

### चैत्र मास.

विनंती विशेष. या महिन्यांत पहिला सण महिन्याच्या व वर्षाच्या आरंभीं **वर्षप्रतिपदा** आहे. या दिवसीं लोक बहुत दान धर्म करितात; परंतु सर्व गोष्टीपेक्षां त्या दिवसीं वर्षफळ ऐकण्याची हिंदु लोकांस मोठी उत्कंठा उत्पन्न होती; चालत्या वर्षीं राजा कोण, मंत्री कोण, पर्जन्याचा स्वामी कोण, देश समृद्ध कोण करील, इत्यादि गोष्टीचें भविष्य जोशाच्या मुखांतून ऐकण्याकरितां जिकडे तिकडे प्रसिद्ध ठिकाणीं देवळांत कोणाच्या ओटीवर किंवा घरांत लोकांचा मोठा समुदाय जमत असतो. जर जोशाने वर्षफळ शुभदायक सांगितलें, तर त्यांस मो-

ठा आनंद होतो, व वाईट सांगितलें तर दुःखी होऊन काळजी बाळगितात. परंतु हें सर्व त्यांचें अज्ञान आहे.

हिंदूलोकांसारिख्या देवभोळ्या व अज्ञानी लोकांस हे जोशी फसवितात, आणि यांत आश्चर्य नाहीं. कारण त्यांस मुळींच खगोलविद्येचें ज्ञान नाहीं. भट जें सांगतील, तें त्यांस मान्य; यामुळें ते ठकले जातात.

२ जोशी लोकहि खऱ्या ज्योतिषाविषयीं गैरमाहीत आहेत. जुन्या लोकानी जें कांहीं अर्धें खरें अर्धें खोटें लिहून ठेविलें आहे, त्यांत पुष्कळ कल्पित कथा मिसळून आतांच्या भटानी आपलें पोट भरण्याचा धंदा चालविला आहे.

३ भविष्यज्ञान ईश्वराने मनुष्याच्या स्वाधीन ठेविलें नाहीं, व जोशासारिखें कल्पित भविष्य सांगणें अवघड नाहीं. शंभर गोष्टींत दहापांच खऱ्या किंवा खोट्या होतातच; असें भविष्य लहान दाहा वर्षांच्या मुलाच्या तोंडांतूनहि वदवितां येईल.

४ अमक्या वर्षीं अमका ग्रह राजा किंवा प्रधान आहे, असें मानणें माहा पातक होय. सर्व प्राणिमात्रांचा व वस्तूंचा नियंता आणि शास्ता जो परमेश्वर तोच सर्व विश्वाचा चिरकाळ राजा आहे. त्यास मंत्री व प्रधान नकोत. त्याचें आधिपत्य कोण घेऊं शकेल! रवी किंवा शुक्र अथवा दुसरे कोणतेहि ग्रह जे अचेतन पदार्थांचे गोळे, त्यांच्याने पाऊस कसा पाडवेल! शेतांतील धान्य पिकविण्याचा व देश समृद्ध करण्याचा अधिकार त्यांच्या हातीं कोठून येईल! सर्वसमर्थ जो भगवान त्यापुढें ते सर्व ग्रह एका अणुरेणूचीहि बरोबरी करूं शकत नाहींत तर

त्यांच्या हातून पर्जन्य पडतो व देश सुखी होतो, असें मानणें कितीं लज्जास्पद आहे? सूर्य, चंद्र, तारे हे सर्व ईश्वराचें हस्तकौशल्य दाखवितात.

५ जोशाच्या पंचांगावर विश्वास ठेविल्याने आपलें कांहीं हित होत नाहीं; उलटी हानीच होती. वर्षफळ वाईट आहे, असें सांगितल्यावरून शेतकरी व दुसरे उदमी व्यापारी यांची आपआपल्या उद्योगाविषयीं हिंमत खचती; ज्या शेतकऱ्यास चार मण दाणे पेरायाचे तो दोनच पेरितो व निराशेने व्यर्थ काळजी वाहत असतो. आणि शेतास चांगलें पीक यावें ह्मणून सृष्टिकर्त्या परमेश्वराची प्रार्थना करणें सोडून वर्षाच्या नावाने रडत बसतो. जरी वर्षफळ चांगलें आहे, असा भटाच्या सांगण्यावर त्याने विश्वास धरिला, तरी तिकडूनहि त्याचा नाशच होतो. कित्येक व्यापारी पुढील विचार न पाहतां त्या वर्षीं उधळेपणाने व्यापार आरंभितात, आणि शेवटीं भिकारी होतात; याप्रमाणें ज्योतिष्यावर विश्वास ठेवल्याने दोन्ही कडून हानि होती.

६ तर हें अज्ञान सोडून हा वर्षप्रतिपदेचा सण दुसऱ्या प्रकारच्या उत्तमाचरणाने पाळावा, तो असा;– ईश्वराने आपणास मागल्या वर्षीं सर्व संकटें व दुःखें यांपासून कृपा करून रक्षिलें व हें नवें वर्ष दाखविलें ह्मणून त्याचा आभार मानावा, आणि तो बाह्याचरणाने सर्वत्रांस दाखविण्याकरितां आपण स्नानादिक करून शुचिर्भूत व्हावें; तैलाभ्यंगच केलें पाहिजे असें नाहीं, साबूनेंहि निर्मळता येती व त्याच्या ठाईं तेलापेक्षां तो गुण विशेष आहे; नंतर ईश्वराने अनुकूळ केल्याप्रमाणें आपल्यापासीं जीं

वस्त्रें असतील तीं परिधान करावीं; मुलांच्या अंगावर अलंकार घालण्यास फार जपावें, मुळीं घालूंच नये हा सिद्धांत; न घातल्यास तेणेंकरून त्यांचें ईश्वरदत्त सौंदर्य उणें होतें, असें नाहीं; मग आपल्या इष्टमित्रांसहित मिष्टान्न भोजन करून तो दिवस परमेश्वराची स्तुति व भक्ति करण्यांत घालवावा. नाना प्रकारच्या सुंदर व सदाचरणाच्या गोष्टी बोलाव्या, आणि भगवंताची असी प्रार्थना करावी. "हे देवा, जसें त्वां आह्मास मागल्या वर्षीं सुखी ठेविलें, तसेंच आतां ठेव; आह्मास सद्बुद्धि दे; आमच्या मनांत वाईट कल्पना येऊं देऊं नको, व आमच्या हातून वाईट कर्में होऊं देऊं नको; तुझ्या आज्ञा पाळण्याकरितां आह्मास शक्ति व बुद्धि दे; आमचा देश धनधान्येंकरून समृद्ध कर; सारांश जसें तुझ्या पवित्र इच्छेस येईल, तसें कर." तथास्तु. याप्रमाणें भगवंताची प्रार्थना केली असतां वर्षप्रतिपदेचा दिवस कल्याणकारक होतो.

याच महिन्यांत दुसरा सण **रामनवमीचा** येतो. हा दिवस उत्साहाचा व उपासाचाहि आहे. कदाचित् तुह्मास असें वाटेल कीं, ह्या सणापासून आपली कांहीं हानि होत नाहीं, अथवा हा पाळल्याने आपल्या हातून कोणतेंहि वाईट कर्म होत नाहीं; परंतु विचार केला असतां या सणाचें खरें रूप दृष्टीस पडेल.

परमेश्वराची असी आज्ञा आहे कीं, "मजपुढें तुला दुसरे देव नव्होत, व मजवांचून तूं अन्य देवांची भक्ति करूं नको." असें असतां ह्या सणाच्या दिवसीं हिंदुलोक काय करितात? रामास ईश्वराप्रमाणें मान देऊन त्याची मूर्त्ती करून तिची पुजा करितात. आतां राम हा कोण

होता ? तो मनुष्य होता. जसे मनुष्याच्या ठाईं कांहीं सद्गुण व बहुत दुर्गुण असतात, तसेच त्याच्या ठाईंहि होते, ईश्वरेच्छेने त्यास राज्य मिळालें तें त्याने संरक्षण करून कांहीं मोठीं कामेंहि केलीं; त्यांचें वर्णन करण्याकरितां त्याच्या दरबारांतील कवींनी त्याच्या चरित्राचें अलंकारयुक्त कवन रचिलें, व त्यापुढें तें गाऊं लागले. तो राजा होता ह्मणून त्याची प्रजा त्याचा जन्मदिवस पाळीत असेल, परंतु पुढें कांहीं काळाने ह्मणजे तो मरण पावल्यानंतर त्याचें स्मरण राहण्याकरितां त्याचा जन्मदिवस व तो लंकेहून अयोध्येस विजयी होऊन आला तो दिवस (चैत्र शुद्ध १ दा) पाळूं लागले असतील.

परंतु एथें दुसरी एक कल्पना असी उत्पन्न होती कीं रामाची कीर्त्ति व पूजा वगैरे लोक लवकरच विसरले असतील. कारण कृष्णाच्या वेळीं रामाची पूजा करणारे लोक कोणी नव्हते व जे कोणी त्यास जाणत, ते केवळ त्याची निंदा करीत.* मारुती व जांबुवंत यांशिवाय रामभक्त त्यावेळीं पृथ्वींत कोणी नव्हते; असें भागवतांतील गोष्टीवरून समजतें.

यावरून **रामनवमी** केव्हांपासून चालू झाली, हें समजत नाहीं, पण ती फार अलिकडली आहे असें दिसतें. इतकें असून रामाने आतांच्या लोकांकरितां काय सामोग्री व मोठें काम करून ठेविलें आहे ! पुरातन काळच्या एका राजास मूर्खपणाने देव मानून भजावें, हें किती अज्ञान आहे !

---

* हरिविजय ग्रंथ अध्याय ३१ पाहावा त्यावरून राम हा तेव्हांच्या लोकांस किती माहीत होता, हें समजेल.

तर आतां सर्व गोष्टीचा सारांश इतकाच कीं सर्वांनी रामास भजण्यापेक्षां रामाचा कर्ता जो ईश्वर जो चिरकाळ राहतो; त्यासच भजावें व अनन्यभावाने त्यासच शरण जावें. हेंच मनुष्यजन्माचें सार्थक आहे.

---

## पत्र ३ रें.

### वैशाख मास.—अक्षतृतीया.

विनंती विशेष; चैत्र महिन्यांतील मुख्य सण वर्षप्रतिपदा व रामनवमी, हे कोणत्या प्रकारचे आहेत, व त्यांपासून कोणती हानि होती, हें आपणास मागल्या पत्रीं कळविलें. आतां वैशाख मास चालूं झाला आहे आणि यांत मुख्य सण **अक्षतृतीया** आहे, ह्यास सण ह्मणायाजोगी याची मोठी प्रसिद्धी नाहीं; त्यासंबंधी जें कांहीं कर्म, तें मुकाट्याने घरांतच करितात. मागल्या महिन्यांतील दोन सणांविषयीं विचार केला असतां त्यांच्या उत्पत्तींत कांहीं तरी सत्याचा अंश दिसून येतो. परंतु ही **अक्षय** ह्मणजे जिचा नाश होत नाहीं, अशा तृतीयेच्या दिवसीं ज्या गोष्टी घडून आल्या ह्मणून पुराणांत सांगितलें आहे, त्या केवळ कल्पित आहेत. प्रत्यक्ष प्रमाणाने त्यांचें मिथ्यत्व दाखवितां येतें. आजच्या दिवसीं भगीरथ राजाने ब्रह्मलोकाहून **भागीरथी** आणिली, अथवा ती विष्णूच्या अंगुष्ठापासून निघाली, हेंच मुळीं असंभाव्य आहे. सृष्टिनियमास ही गोष्ट अगदीं विरुद्ध आहे, व कारणावांचून ईश्वर कोणताहि अद्भुत चमत्कार करीत नाहीं. **भागीरथी** नदी इतर नद्यांप्रमाणें उत्पन्न झाली आहे; यावरून

ह्या सणास मूळच नाहीं; मग हा सण किंवा त्यासंबंधी व्रतादिक नियम हे अर्थांतच निरूपयोगी व खोटे ठरले. आतां कदाचित् असें झालें असेल कीं, **भगीरथ** राजाने भागीरथीचा उगम स्वतां जाऊन पाहिला असेल, किंवा त्या वेळीं एकादा मोठा घाट बांधला असेल अथवा त्याने तिचें वर्णन लिहून ठेविलें असेल, ह्मणून त्याचें नाव त्या नदीस प्राप्त झालें, असें अनुमान करण्यांत कांहीं संभव व योग्यता तरी दिसती; व हा तर्क उपमानावरून करितां येतो.

तर पराचा कावळा करून हा सण ईश्वरस्थापित आहे, असें मानून तो पाळणें हें केवढें अज्ञान आहे!

हा सण ज्या ऋतूंत येतो त्यांत उष्मा फार, ह्मणून हिंदुलोक ब्राह्मणास उदक, कलश, पंखा, छत्री, जोडा इत्यादि पदार्थ दान देतात. आणि असें समजतात कीं, आपणास किंवा आपल्या पितरांस मरणोत्तर स्वर्गीचा मार्ग क्रमतांना उष्ण निवारणार्थ छत्री मिळेल, पायांस कंटकादि रुततील ह्मणून जोडा मिळेल, तृषा शांत करण्यास उदक मिळेल; तर केवढें हें अज्ञान! हे पदार्थ आपणास तेथें प्राप्त होतील, यास प्रमाण काय? भट सांगतात ह्मणून ऐकावें काय? तर केवळ त्यांजवर विश्वास ठेवूं नये, ईश्वराने आपणास बुद्धि दिल्ही आहे, तिच्या योगाने शोध करून पाहावें. जर भटास दान दिल्हेले पदार्थ आपणास परलोकीं प्राप्त होतील, तर एथेंच आपल्या एका मित्रास कांहीं पदार्थ पाठवायाचा आहे, आणि तो परस्थळीं राहत असला तर तो ब्राह्मणास कां हो देत नाहीं? त्यास दिल्ह्याने आपल्या मित्रास पोंहच-

णार नाहीं कीं काय ? आणि जर दाहा पांच कोशावर पोहंचत नाहीं, तर कोट्यावधी योजने दूर असा जो ऊर्ध्व लोक तेथें कसें पोहंचेल ? आणि असें असेल तर सरकारास डाकेचा एवढा मोठा खर्च बाळगण्याची गरज नाहीं एकाद्या ब्राह्मणास दोनशे रु० दरमाहा देऊन जवळ बाळगला ह्मणजे झालें.

ह्या सणासंबंधीं दुसरें एक अज्ञान दृष्टीस पडतें. अक्षतृतीयेच्या मुहूर्तानें शेतांत नांगर फिरविला असतां अथवा मळ्यांत बीं पेरिलें असतां त्याची उत्पत्ति पुढें चांगली होती, असी लोकांची समजूत आहे. परंतु अशा प्रकारच्या समजुतीने त्यांचा ईश्वरावरील भरंवसा उडतो; तो त्यांस सर्व पदार्थ पुरवीत असतांहि त्याचे उपकार न आठवितां ते भलत्याच वस्तूंस आपला रक्षक व आपला दाता असें मानितात. अमक्या दिवसीं अमुक काम केलें ह्मणजे तें सफळ होतें, मग त्या कर्मावर ईश्वराचा आशिर्वाद नसला तरीं कांहीं चिंता नाहीं, असें सर्वदा मनांत वागण्यास ही समजूत किंवा हें शास्त्रमत कारण होतें. केवढें हें पातक ! सृष्टि निर्माणकर्त्याचा विसर पडणें व त्यावरून भक्ति उडणें असे भयंकर परिणाम ज्या सणाच्या प्रवृत्तीपासून उत्पन्न होतात, तो सण सहसाहि पाळूं नये.

मी जें आपणास लिहितों, त्याचें आपण चांगलें मनन करावें व त्यांतील गोष्टी खऱ्या आहेत किंवा नाहींत, हें पाहावें. सारांश जी गोष्ट परमेश्वराच्या आज्ञेस व आपल्या सद्बुद्धीस विरुद्ध ती खोटीच समजावी व जें खोटें आहे, तें कदापि स्वीकारूं नये, आपणास जर सत्याची प्रीति असली व ईश्वराची सद्गति धरणें असलें, तर अशा

प्रकारच्या सणांस आपल्या घरांतून रजा द्यावी, व होईल तितका प्रयत्न करून दुसऱ्याच्या घरांतून ते काढले जावे ह्मणून त्यास सुबोध करीत जावा; हे विनंती.

---

## पत्र ४ थें.

### जेष्ट मास—वट सावित्री.

विनंती विशेष; आपल्या हिंदुलोकांचे सण व व्रतें इतकीं पुष्कळ आहेत कीं, त्या सर्वांचें विवरण करून त्यांजवर विचार लिहूं गेलें असतां मोठा ग्रंथ होईल, व तें काम एका दोघांच्या हातून होणें अशक्य आहे; यास्तव सर्व सणांविषयीं आपल्यास ल्याहावें, असा माझा उद्देश नाहीं. प्रत्येक महिन्यांत जे मुख्य मुख्य आहेत, त्यांविषयीं मात्र लिहितों. हिंदूच्या सणांत पुरूषांचे व स्त्रियांचे, असे निरनिराळे सण आहेत. कित्येक उपवास व व्रतें पुरुष मात्र करितात, त्यांत बायकांचा संबंध नसतो. दुसरे कांहीं सण असे आहेत कीं, ते स्त्रियानीच केले पाहिजेत, तिसरा प्रकार असा आहे कीं, उभयतां स्त्रीपुरूषानी व्रतस्थ राहिलें पाहिजे. आतां पाहा, जर ह्या सणांचा उद्देश ईश्वराचीच भक्ति करण्याचा असता, तर ती असी निरनिराळ्या पद्धतीने विभागून कां दिल्हीं असती ? व्यवहारांत तरी असी नीति आहे काय? अमक्ये दिवसीं स्त्रीनेच खरें बोलावें, अमक्ये दिवसीं पुरूषानेच सत्य बोलावें, किंवा स्त्रीने एका दिवसीं जेवावें व दुसऱ्या दिवसीं तिच्या नवऱ्याने जेवावें, असे नियम कोणी लावून देतो कीं काय?

असो, ह्या ज्येष्ट महिन्यांत स्त्रियांचा एक मोठा सण

येतो. - त्याचें नाव **वट सावित्री** व्रत. ह्या व्रताच्या उत्पत्ती विषयीं ज्या गोष्टी भट सांगतात, त्यांच्या खरेपणाविषयीं (शब्द प्रमाणाखेरीज) एकहि प्रमाण त्यांच्याने देववत नाहीं. **अश्वपती** राजा केव्हां होता, व त्याच्या कन्येचा सकल वृत्तांत कोणी लिहिला, हें कांहींच कळत नाहीं. जें भारत आतां पुराणीक सांगतात, तेंच **परिक्षिती** राजास जन्मेजयाने सांगितलें; त्यास त्याचा पिता व्यास याने सांगितलें; त्या भारथांत धर्म राजास लोमेश ऋषीने जी सावित्रीची कथा सांगितली, तिचा साक्षी तो नव्हता; ती त्यास एकाद्या पुरातन ऋषीने सांगितली असेल. याप्रमाणें ही कथा निर्मूळ आहे. बरें तें असो; आतां आपण त्या कथेकडेसच लक्ष देऊं या, अश्वपतीस पुत्र नव्हता ह्मणून त्याने ब्रह्म देवाची **सावित्रीदेवी**, इला प्रसन्न केलें. पण ती बापुडी काय करील! दैवापुढें तिचा उपाय चालला नाहीं. राजास तिच्याने पुत्र देववत नाहीं ह्मणून तिने कन्या दिल्ही. परंतु याचा कोणी असा विचार करीत नाहींत कीं, ज्याला हवेली बांधितां येती, त्याला रंगमाहाल बांधितां येणार नाहीं कीं काय ? जिला स्त्रीच्या शरिराची रचना करितां आली, तिला पुरुषाचें शरीर निर्माण करणें अशक्य होतें कीं काय? एखादा साधारण चितारी असला तर त्यास दहा पांच प्राण्याची आकृति काढितां येती, आणि ह्या सावित्री देवीची शक्ति कोठे गेली ?

आतां सावित्रीचा पती **सत्यवान** ह्याची पाहा कसी गोष्ट आहे. त्यास अरण्यांत काष्टें तोडितांना मरण येऊन **यम** नेत असतां त्याच्या बायकोने त्यास सोड-

विलें. ही गोष्ट झाली तेव्हां तिसरें मनुष्य कोणी तरी साक्षीस होतें कीं काय? जर ही गोष्ट खरी मानावी, तर तिचा यमास कसा विसर पडेल? व धर्मराजास लोमेश ऋषीनें सांगण्याचें तरीं काय अगत्य होतें? धर्म हा यमाचा अवतार असतां तो ही गोष्ट कसी विसरला? आणखी **पांडवप्रताप** नामक ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, तेव्हांपासून सर्व स्त्रिया वटसावित्रीची पूजा करूं लागल्या तस्मात् तें व्रत पांडवाच्या व कौरवांच्या घराण्यांतील स्त्रियांस व कृष्णाच्या सोळा हजार नारींतून कोणास तरी माहित असावें, व कोणी तरीं तें चालवावें कीं नाहीं? तात्पर्य हेंच कीं पांडवांच्या वेळीं हें व्रत कोणी करीत नव्हते तें न करण्याबद्दल त्यांच्या स्त्रियांस दोष लागला नाहीं; तर आतांच्या स्त्रियांसहि त्याची काय गरज आहे?

परंतु या व्रताविषयींच विचार करूं लागलें असतां त्यांतहि पोरकटपणा दिसून येतो. वडाच्या वृक्षाची डाहाळी जी ढोरापुढें ठेविली असतां तिचीं पानें लवकरच नाहींसीं होतात व ज्यांचा भटास पत्रावळी लावयास उपयोग पडतो, व जिचें काष्ट सत्यवानच जळणाकरितां तोडीत होता, तिची पूजा करून काय प्राप्त होणार आहे? आणि सत्यवान व सावित्री हीं आपणासारिखींच पापी मनुष्यें असतां त्यांच्या नावानें व्रत उपवासादि करणें हें केवढें मूर्खपण आहे! हे माझे प्रिय मित्र हो, आह्मा-हिंदूंच्या स्त्रिया अशा प्रकारच्या अज्ञानसागरांत बुडाल्या आहेत. त्यांचा धर्म ईश्वर व त्याच्या आज्ञा अशा प्रकारच्या क्षुल्लक, नीच, निर्जिव व बुद्धिहीन पदार्थांच्या पूजेंत आहेत. हाय हाय! ह्या निर्दय व मूर्ख भटानी

केवढा अनर्थ मांडिला आहे! जेणेकरून आत्म्याचा नाश होईल, असीं कर्में ते ह्या पशुतुल्य स्त्रियां करवीं करवितात. परमेश्वराचें भजन व प्रार्थना सोडून कधीं काळचीं कल्पित स्त्रीपुरुषें वडाच्या झाडांत आहेत असें मानून त्यांची पूजा करणें हें मोठें पाप आहे.

---

## पत्र ५ वें.

आषाढ मास— महाएकादशी. श्रावण मास— नागपंचमी, नारळी पौर्णिमा व गोकुळ अष्टमी.

विनंती विशेष; जे लोक एका भगवंतास सोडून अनेक कल्पित दैवतांच्या भजनास लागतात त्यांच्या पाठीसीं अनेक उपाधी येतात, व एकाद्या वस्तुपासून त्यांस भय प्राप्त झालें असतां तें निवारणार्थ तिची अज्ञानाने कृपा संपादन करूं लागतात, ही गोष्ट या पत्रीं ज्या सणाविषयीं लिहितों त्यावरून स्पष्ट दिसण्यांत येईल.

ह्या पत्राचा क्रम पाहिला असतां यांत आषाढी एकादशी जिला महा एकादशी ह्मणतात, तिजवर विचार असावा. परंतु पुढें कार्तिकांतहि दुसरी एक असीच महा एकादशी येईल, ती व दुसरे जे उपवास आहेत त्या सर्वांवर एकच साधारण विचार लिहिण्याचा माझा वेत आहे, ह्मणून आतां श्रावण मासांत जे सण येतात, त्यांविषयीं लिहितों. श्रावण महिना चातुर्मासांत मोठा पवित्र मानिला आहे. ह्याचे सर्व दिवस सणाचे व्रताचे व उपवासाचे आहेत, असें ह्मटल्यास चिंता नाहीं. परंतु

त्या सर्वांचें वर्णन करण्याचा माझा हेतु नाहीं, ह्मणून एक दोन सणांचा मात्र आपण विचार करूं.

ह्या महिन्याचा प्रारंभ झाला ह्मणजे पांचव्या दिवसीं **सर्पांची** पूजा करण्याचा सण येतो. त्यास **नागपंचमी** असें ह्मणतात. सर्पाची पूजा फार प्राचीन आहे. पुरातन काळच्या पुष्कळ देशांत ती चालत होती. बाबेलेन, मिसर, इराण, ग्रीस, रोम इत्यादि देशचे लोक **नागाची** पूजा करीत. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतहि अझून सर्पास पूजितात. परंतु नाग हा कोण ? सर्व प्राण्यापेक्षां नीच, ज्यास कोणी राहवयास स्थळ देखील देणार नाहींत, जो धुळींत लोळणारा, बिळांत राहणारा, ज्यास मनुष्याने पाहिलें ह्मणजे लागलाच त्या परस्परांचा ठाईं वैरभाव उत्पन्न होतो, ज्याला माणसें सुऱ्या कोयत्यांनी तोडितात व दगडा धोंड्यांनी ठेंचतात, ज्यास गारूडी आपलें पोट भरण्याकरितां दारोदार घेऊन फिरतात, त्यास देव मानून त्याची पूजा करणें व जो मान **ईश्वरास** मात्र योग्य होय, तो त्यास देणें हें केवढें दुष्टपण होय ! ज्यांची अंतःकरणें परमेश्वरापासून फिरून जे त्याचा द्वेष करीत असतील, तेच असली अघोरी पूजा करितील. अशाविषयीं **पौल** नामक एका साधुपुरूषाने असें ह्मटलें आहे कीं, "ते आपल्याला शाहणे ह्मणत असून मूर्खच झाले आणि त्यांनी अनश्वर ईश्वराचा महिमा बदलून नश्वर मनुष्य पक्षी चतुष्पाद जनावरें व सर्पादि जीव यांच्या मूर्ति स्थापिल्या यास्तव ईश्वराने त्यांला सोडून दिल्हें." हें माझे प्रिय मित्रहो, ज्याने अठराशें वर्षांमागें जी ही गोष्ट त्या वेळेचे लोकांविषयीं लिहिली, तीच आतांच्या हिंदु लोकांस पाहा

बरें कसी लागू पडती? यावरून काय समजावें कीं मनुष्य भ्रष्ट झाल्यापासून सर्व काळांत व सर्व देशांत त्याचीं कर्मैं भ्रष्टच दृष्टीस पडतात. तर ह्या गोष्टीचा आमच्या लोकांनी विचार करावा व शुद्धीवर येऊन आपण जें कांहीं करीत आहों तें खरें किंवा खोटें, हें पाहावें, आणि सत्याचा स्वीकार करावा, ह्मणजे त्यांस सर्पादिकांच्या भयाची अशा प्रकारें पीडा होणार नाहीं. जो ईश्वरावर भरंवसा ठेवितो, त्याविषयीं असें वचन आहे कीं "ईश्वर त्याला सर्व अरिष्टांपासून रक्षील," व जरीं त्यास सर्पापासून बाधा झाली, तरी तो परमेश्वरापासीं असें बोलतो कीं, हे **ईश्वरा**, तुझे न्याय सत्यच आहेत, आणि सत्यता धरून त्वां मला पिडिलें आहेस, हें मी जाणतों याप्रमाणें ईश्वरभक्तांस दुःख झालें, तरी त्यांच्या मनांत समाधानच असतें; तें समाधान सर्पादि जीवजंतूस पुजल्याने कधीं प्राप्त होणार नाहीं.

श्रावण मासांत दुसरा सण **नारळीपौर्णिमा** आहे ह्या सणाची देशावर फारसी प्रख्याती नाहीं, तरी समुद्रकांठचे राहणारे लोकांत व त्यांत विशेषेंकरून मुंबईंत याचें माहात्म्य मोठें आहे. समुद्राची शांति व्हावी व त्याने व्यापारी लोकांचीं तारवें बुडवूं नये, ह्मणून त्यास सर्व हिंदुलोक एकएक नारळ देतात. परंतु समुद्र कां खवळलेला असतो व तो श्रावणी पौर्णिमा झाली ह्मणजेच कां शांत होऊं लागतो, या गोष्टीचें कारण कोणी शोधून पाहत नाहीं. आणि जर भट ब्राह्मण हें शोधून त्याप्रमाणें लोकांस चालावयास सांगतील, तर त्यांची पोटगी बुडेल; परंतु जें सत्य आहे, तें सर्वत्र प्रसिद्ध करून

असत्याचा नाश करावा, हा आपला धर्म आहे, ह्मणून नारळीपौर्णिमेविषयीं आपणास थोडेसें लिहून कळवितों.

दक्षिण वाऱ्याकडून दोन तीन महिनेपर्यंत समुद्र खवळलेला असतो, हें सर्वांस माहित आहेच. आणि तो वारा बंद पडला ह्मणजे समुद्र हळु हळु शांत होतो. असा ईश्वरी नियम असतां उगीच आपलें मूर्खपण दाखविण्याकरितां समुद्रांत नारळ, फुलें, पानें, सुपाऱ्या, कां टाकाव्या? जर एकाद्या वर्षी याप्रमाणें त्यास मान न दिल्हा तर वादळ व तुफान बंद होऊन जहाजें चालणार नाहींत कीं काय? आणि जे कोणी त्यास नारळ देत नाहींत, त्यांचें तो काय अकल्याण करितो? यास्तव नारळीपौर्णिमेचा सण व त्यासंबंधी उत्साह आनंद वगैरे हीं सर्व खोटीं, निष्कारण, निष्फळ व परमेश्वरास संताप आणणारीं आहेत. ज्या ईश्वराविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "तो आपल्या हाताच्या तळव्यांत समुद्राचें पाणी साठवितो;" त्याच्याने वादळ व तुफान बंद करवणार नाहीं कीं काय? तीं नारळ दिल्ह्याने बंद होतात कीं काय? अथवा समुद्र आपण होऊन बंद करितो कीं काय? नाहीं; परमेश्वरच त्यांचा नियंता आहे. त्याच्या एका भक्ताने त्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, हे परमेश्वरा, तूं समुद्राचा उल्हास शासितोस व त्याच्या लाटा उचंबळतात, तेव्हां त्या तूं शांत करितोस. समुद्र केवळ निर्जीव पदार्थ आहे. जे लोक त्यास भक्तिपूर्वक नारळ अर्पण करितात, तोहि घेण्याची त्यास शक्ति किंवा बुद्धि नाहीं; हें प्रत्यक्ष पाहत असतां आपण कां बरें आंधळे व्हावें व वांकड्या मार्गाने चालावें? आपणास जी भक्ति व पूजा

करण्याची इच्छा आहे, ती योग्य ठिकाणीं लावूं या. "समुद्रास नारळ वगैरे अर्पण करणें सोडून त्याबद्दल त्याच्या उत्पन्नकर्त्यास आपलीं अंतःकरणें अर्पण करूं या. चापा मोगरीं इत्यादि पुष्पें अर्पण करण्याबद्दल सुवासिक व अविनाशी भक्तिरूप व प्रीतिरूप पुष्पें त्यास अर्पण करूं या." परमेश्वराने दयाळू होऊन समुद्र शांत केला ह्मणून त्याचीच स्तुति करावी हेंच शाहणपण व मनुष्यपण आहे.

नारळी पौर्णिमा झाली ह्मणजे सातव्या व आठव्या दिवसीं **जन्माष्टमी व गोकुळअष्टमी** हे सण येतात. मुंबईंत आणि आसपास चौल, अलिबाग इत्यादि ठिकाणीं ह्या सणासंबंधी अज्ञान व ढोंगें फार माजलीं आहेत. कानोबाचें 'अस्तान' (स्थान) अथवा मठ बहुतेकांच्या घरीं आहेत, तेथें जन्माष्टमी गोकुळअष्टमी व अणखी पुढें चार पांच दिवसपर्यंत मोठा गोंधळ होत असतो. जे लोक त्या ठिकाणीं जमतात, त्यांच्या अज्ञानाची व देवभोळेपणाची पराकाष्ठा दिसून येती, जन्माष्टमीच्या रात्रीं कानोबाच्या भक्तांच्या आंगांत वारीं येतात, तेव्हां तीं एखादा वेडा मनुष्य जस्या उड्या मारितो, त्याप्रमाणें इकडे तिकडे नाचून मोठ्याने ओरडतात, व भूमीवर हात पाय आपटतात. त्यांपासीं पुष्कळ स्त्रिया व पुरुष नवस करायास व केलेले असतील ते फेडायास येतात. कोणी रोगी मुलें व तरूण यांस आणितात, कोणी आपल्या पोटीं संतान नाहीं ह्मणून, कोणी आपल्या पोटचें मूल वांचत नाहीं ह्मणून, कोणी आपली सून नांदत नाहीं ह्मणून, कोणास भूत बाधा झाली ह्मणून, कोणास कोणी करणी केली ह्मणून;

असीं अनेक निमित्तें व कारणें सांगून बिचारे भोळसर पिडीत झालेले आंधळ्याप्रमाणें वाट चुकून चालणारे पुरुष व स्त्रिया यांची जी तेथें दाटी होती ती पाहून माझें अंतःकरण काकळुतीनें वितळून जातें. गरीब बिचारे हे हिंदु लोक, मेंढराप्रमाणें कशा ह्या खाटक्यांच्या हातीं आपली मान देतात. भगवंतासारिखा सर्वसमर्थ व कनवाळू मायबाप त्यांस असतां ते त्याचा अव्हेर करून आपल्या सारिख्या निर्बळ, रोगग्रस्त, भयग्रस्त, पापपिडीत अशा प्राण्याजवळ शरण जाऊन त्यापासीं आपलें कल्याण व्हावें ह्मणून प्रार्थना करितात. परंतु डोळे उघडून विचार कसा करीत नाहींत ? जन्मभर रेतीचा घाणा फिरवीत बसलें असतां आसूंभर तरी तेल निघेल कीं काय ? अथवा आपणास क्षुधा लागली असतां ती दगड चुखल्याने शांत होईल कीं काय ? त्याप्रमाणेंच ह्या कानोबासारिख्या देवापुढें कांतडें जाई तोंपर्यंत मस्तक घांसलें ह्मणून काय प्राप्त होणार आहे ?

आतां जे लोक आपणास कानोबाचे भक्त ह्मणवितात व ज्यांच्या आंगीं वारीं येतात, त्यांचीं तीं वारीं कसीं व त्यांचे भक्त कोणत्या प्रकारचे मनुष्य असतात, व त्यांचीं कर्में व आचरणें कसीं असतात हें लिहितों.

त्यांच्या अंगांत जीं वारीं येतात, तीं सर्व खोटीं आहेत. त्या वाऱ्यांचें आचरण असें असतें कीं, त्याप्रमाणें जर एकादा मनुष्य सभ्य व सुज्ञ गृहस्थाच्या सभेंत करूं लागेल तर त्याच्या शेजारीहि कोणी उभें राहणार नाहीं. त्याला पाहून लोक दूर पळतील व त्यास वेडा समजून हांकून लावतील. त्याजबराबर कोणी भाषण

किंवा व्यवहार करणार नाहींत. तो सर्व प्रकारें मनुष्य-समुच्चयांत राहण्यास व कोणतेंहि अकलेचें काम चालविण्यास बिलकूल योग्य नाहीं. असी मनुष्याची अवस्था असतां कानोबाचीं वारीं आपणास देव ह्मणवून असी कसी वर्तणूक करितात? ज्या एकाद्या उमेदवाराच्या अंगांत प्रथम वारें आणतात त्याच्या किंवा ज्याच्या नेहेमी वारें येतें, त्याच्या आंगांत कानोबा येऊं लागला ह्मणजे "भक्त" त्याच्या अंगावर तोरड मारितो. नंतर वारें खरेंखुरें आलें असें समजण्याची खूण असी कीं, तो कांहीं वेळ बेशुद्ध झाल्यासारिखा होऊन एकाएकी मोठी आरोळी ठोकितो, व जमिनीवर धाडदिशी आंग टाकून लोळूं लागतो. नंतर हात पाय आपटितो, डोईचे केश पिंजारतो, राख उधळतो, पाणी सांडतो, भिंतीस धक्के देतो, उड्या मारितो, आसपासच्या माणसांवर गोलाट्या खात खात पडायास धांवतो, पूर्वीं आंगांत वारें येऊन जो जमिनीवर पडलेला असतो त्यास तुडवितो, वेडें वांकडें तोंड करून चंद्रावेंद्राप्रमाणें इकडे तिकडे टकमका पाहतो; वाहवा, असें एकादें सोंग तमाशांत आणिलें, तर मग काय मौज होईल! काय हो, हीं कृत्यें देवाला व त्याच्या गुणाला शोभतात कीं काय? वर लिहिल्याप्रमाणें माणसांलाहि तीं शोभत नाहींत; मग देवाची गोष्ट तर दूर आहे.

आतां कानोबाचें वारें आंगांत खेळतें, त्याच्या येण्याचें गुह्य कोणी शोधून पाहत नाहींत; परंतु जे उपचार कानोबाच्या झाडास होतात, ते पाहिले ह्मणजे त्याचें कारण सहज कळों येतें. १ ज्याच्या आंगांत प्रथमच वारें

आणायाचें असतें; त्यास तर वारें घेण्याची मोठी आवड असती. २ तो सारा दिवस उपासी असतो. ३ वारें येतावेळीं त्याच्या नाकासीं पुष्कळ वेळपर्यंत सबजा ह्मणून एक मोठी मस्तक उठविणारी व गुंग करणारी वनस्पति आहे तिचा पाला एक जण हुंगवीत असतो. ४ त्याच्या जवळ दुसरे पुष्कळ जण ओरडत असतात. ५ एक जण त्याजवर पाणी व राख उडवीत असतो. ६ ज्याच्या वासाने मस्तक भ्रमिष्ट होतें, असा ऊद त्यापुढें पुष्कळ जाळीत असतात. ७ त्याजभोवतीं हलक्या, टिमक्या, तासे, ढोल, झांज इत्यादि कर्कश वाद्यांचा इतका कडाका करितात कीं एकादा नाजुक प्रकृतीचा माणूस तत्क्षणींच घेरीं येऊन पडेल. ८ इतकीं साहित्यें मिळऊन नंतर जर वारें येण्यास अवकाश लागला तर त्याच्या गळ्यांत तोरड घालून त्यास ओढून वांकवितात, त्याचा कान पिळतात, त्याला हालवितात; इतकें झालें ह्मणजे त्यास प्रथमच वारें घेण्याची मोठी आवड असून वारीं कसीं नाचतात, उडतात हें त्याने पाहिलें असतें, मग तो भ्रमिष्ट होऊन मनांतील उत्कंठेच्या जोराने वर सांगितल्याप्रमाणें मर्कटचेष्टा करूं लागतो. आतां ह्या नऊ प्रकाराने वारें आणणें कठीण नाहीं. आणि यापेक्षां सोपे उपाय पाहिजे असल्यास एकाद्यास भांग किंवा धोतऱ्याचा रस पाजला असतां तोहि असेंच चाळे करील, व "लाफिंग्यास" ह्मणून एक वायुरूप पदार्थ आहे त्याच्या योगाने तर हासता कानोबा आणतां येईल.

अरेरे! व्यर्थ बिचारे हे भोळे हिंदुलोक अशा ठकांच्या नादीं लागून फसतात.

जर कानोबाचें वारें खरें आहे तर मी एक त्यास असें सांगतों कीं, वर सांगितलेले उपचारांतून कांहीं न करितां केवळ शब्दाने ज्याच्या पाहिजे त्याच्या अंगांत कानोबा प्रगट करावा. कोणी अशा रितीने कानोबा आणण्यास राजी होईल, तर मी आपल्या खुशीने वारें घेण्यास तयार आहें.

या प्रकारें कानोबा देवाचे गूण व आचरण यांचें विवरण झालें; आतां त्याच्या भक्ताचे गूण कसे आहेत हें सांगतों. ते सर्व ढोंगी व द्रव्यलोभी असून बहुदा असत्य भाषण करितात. त्यांच्या तोंडांतून शिव्या व बीभत्स शब्द वारंवार निघत असतात. आंगांत वारें आल्याचें मिष करून लोकांस ठकविण्यास ते मोठे धूर्त असतात. एकाद्यास गुण येण्याचा वायदा अशा हिकमतीने करितात कीं, तो खरा झाला किंवा खोटा झाला तरीं दोन्हींकडून पळून जाण्याची वाट ठेवितात. त्यांतून बहुतेकांचा ज्यांचें तोंड पाहणेंहि अनुचित् अशा पातकी कसबिणी यांजकडे जाण्याचा परिपाठ असतो. त्यांकरितां देव ऋषीपण व मंत्र तंत्र करण्याचा धंदा हे पत्करितात. यांची बुद्धि दुष्ट, व घातकी असती; कोणी त्यांस सांगितलें कीं तुह्मास अमुक रुपये देतों तुह्मी अमक्यास मूठ मारा, तर जरी तें काम त्यांच्या हातून होण्याची शक्यता नाहीं तरी त्याचा पत्कर घेतात. असे ह्या कानोबाच्या भक्तांचे दुर्गुण पाहून त्यांजबरोबर भाषण करण्यासहि तिरस्कार वाटतो; तर अशांस लोक देवाप्रमाणें मानून रात्रंदिवस त्यांची सेवा करितात, ही केवढी लज्जेची गोष्ट आहे! आतां ज्यांस दुःख व विपत्ती प्राप्त होतात, त्यांनी

परमेश्वराची असी प्रार्थना करावी कीं, हे देवा, "संकटांतून निघावें ह्मणून आह्मास सहाय कर, कां तर मनुष्याची मदत व्यर्थ आहे." आणि जे प्रेमळ अंतःकरणानें ईश्वरापासीं असी प्रार्थना करितात, त्यांचें तो सहाय करितो. कारण "आभाळांतील पक्षी जे पेरीत नाहींत किंवा कापीत नाहींत, अथवा कोठारांत धान्य सांठवीत नाहींत; तथापि तुमचा आकाशांतील बाप त्यांचें पोषण करितो, तर त्यांपेक्षां तुह्मी चांगल्या स्थितींत नाहीं कीं काय ? आणि तो तुमची काळजी वाहत नाहीं कीं काय"? तर सर्वांनी एका परमेश्वरावरच भरवसा ठेवावा, व असे भलभलते उपाय करण्याच्या नादीं लागूं नये. जे उपाय त्यानें योजिले आहेत, तेच करावे, व त्यापासून जरी कदाचित् वाईट झालें, तरी ईश्वराची स्तुतीच करून असें ह्मणावें कीं, "ईश्वराचे न्याय सत्य आहेत, ते सर्वदा सात्विक आहेत," ह्मणून तो कधी आपणासीं अन्यायानें वागणार नाहीं.

या पत्राचें आपण चांगलें मनन करावें ह्मणजे श्रावण मासांतील सणांपासून मनुष्यास लाभ किंवा हानि होती, हें समजेल.

---

## पत्र ६ वें.

### भाद्रपद मास—गणेशचतुर्थी.

विनंती विशेष, मागल्या पत्रीं आपणास जो विचार लिहून कळविला, त्यावरून आह्मा हिंदु लोकांचे सण कोणत्या प्रकारचे आहेत, याविषयीं आपली समजूत बरी-

च झाली असेल. आजपर्यंत मी सात सणांवर निःपक्षपाताने विचार लिहिला; परंतु त्यांतून एकहि मनुष्याच्या सुखार्थ व ईश्वराच्या गौरवार्थ आहे, असें दिसत नाहीं. माझी असी इच्छा नाहीं कीं, हिंदुचे सर्व सण वाईट निघावे. परंतु मी काय करूं? जरी ते बाहेरून कित्येकांस चांगले दिसतात, तरी त्यांचें व्याख्यान करूं गेलें असतां त्यांत जें मुळचें अपवित्र, व अकल्याणकारक असतें, तें सहज बाहेर पडतें. जसी आच्छादित शवगर्ता बाहेरून चुना वगैरे लाविल्याने सुशोभित दिसती; परंतु उघडून पाहिली असतां तिची कुष्टाण घेववत नाहीं, तसी ह्या सणांची अवस्था आहे. आतां भाद्रपद महिन्यांत जे सण येतात, ते कोणत्या प्रकारचे आहेत तें पाहूं या.

भाद्रपदांत मुख्य सण **गणेशचतुर्थी** आहे. त्याशिवाय हरितालिका, ऋषिपंचमी इत्यादि, बायकांचे सण आहेत. परंतु त्यांविषयीं मी आपणास आतां लिहीत नाहीं. गणपतीचा उत्साह चहूंकडेस होतो, ह्मणून त्यावर माझें मत व विचार आपणास कळवितों.

**गणपतीचे** सणापासून बहुत हानी होती. एक तर कालापव्यय तो असा;– ज्यास घरीं गणपती करायाचा असतो, तो पूर्वींच एक दोन महिने, ह्मणजे आषाढ श्रावणापासून गणपतीचें काम चालू करितो व दर रोज एक दोन तास तरी त्याकडे आपला वेळ खर्चितो. हाच जर वेळ दुसऱ्या उपयोगी कामास लावला तर त्याचें किती बरें होईल? गणपतीचे दिवस आले ह्मणजे त्यांस दुसरें कांहीं सुचत नाहीं. त्यांचें सर्व ध्यान मन तिकडे असतें. तेंच जर ईश्वराच्या भक्तीकडेस लावतील तर किती

बरें होईल! याप्रमाणें गणपतीचा दिवस येई तोंपर्यंत कालहानी होते.

नंतर घरांत गणपतीची स्थापना झाली ह्मणजे कालहानीस द्रव्यहानी, सद्गुणहानी, सदाचरणहानी ह्या येऊन मिळतात. गणपतीपुढें आराष व बैठक करण्याची उमेद जसा ज्याजवळ पैका असेल तसतसी अधिक वाढते व तसा गणपतीहि अधिक दिवस घरांत ठेवितात; ह्मणजे दीड, पांच, सात, दाहा, अकरा, क्वचित् एकवीस दिवस गणपतीचा उत्साह होत असतो. तो उत्साह कशाचा? मोठी आराष करून त्याजपुढें कीर्तन करवितात व गवयाचें गाणें व अतिशय अमंगळ व नीच अशा कसबिणीचे नाच करवितात. हाय हाय! धिक् तो गणपती व त्याचे भक्त! ज्यांचे तोंडहि पाहणें अनुचित् व ज्यांबराबर भाषण करणें अगदींच भ्रष्टकारक अशा ज्या व्यभिचारिणी पातक विकणाऱ्या व दुसऱ्याचें द्रव्य, शरीर, अब्रू यांचा नाश करून नरकप्राप्तीचें साधन करून देणाऱ्या स्त्रिया, त्यांस आपल्या घरांत आणून देव ह्मणविलेल्या मूर्त्तीपुढें नाचविणें हें किती लज्जास्पद व पापिष्ट कर्म आहे! याशिवाय गणपतीच्या सणांत बहुतेक ठिकाणीं जुगार चालतो. त्या जुगारांत गणपतीसहि बराबर घेतात. पहिल्याने जो डाव खेळायाचा, तो गणपतीच्या नावें खेळतात व त्यांत जें कांहीं मिळेल तें गणपतीस अर्पण करूं असी प्रतिज्ञा करितात. याप्रमाणें दुराचरणाने संपादित केलेलें द्रव्य ते आपल्या दुराचरण प्रिय देवास देतात, यांत आश्चर्य नाहीं.

कोणी ह्मणतील कीं, हे सर्व प्रकार, लोक अज्ञानाने

करितात. हिंदुशास्त्रांत असें करावें ह्मणून कोठें सांगितलें आहे? तर आपण गणपतीविषयींच विचार करूं. गणपती हा कोण आहे? न्यायदृष्टया पाहिलें असतां प्रत्यक्ष प्रमाणानें तो मातीचा विलक्षण पुतळा आहे, व अनुमान प्रमाणानें पाहिलें तरी त्यांत सजीवत्वाचीं कांहींच चिन्हें अनुभवास येत नाहींत. जरी तो सजीव आहे असी मिथ्या कल्पना केली, तरी त्या बापुड्याच्या हातांत कांहीं सत्ता नाहीं; जेव्हां ब्राह्मण त्याजमध्यें मंत्राच्यायोगानें जीव घालितो, तेव्हां त्यास जीव आला असें लोक ह्मणतात, व जेव्हां ब्राह्मण त्याचा जीव बाहेर काढितो, तेव्हां गणपतीचा जीव गेला असें समजतात, व भट त्यास गच्छ, गच्छ, जाजा असें ह्मणून जसें एकाद्यास कंटाळून बाहेर हांकून लावितात, तसें त्या बिचाऱ्या गणपतीस तळ्यांत, विहिरींत, नदींत, किंवा समुद्रांत टाकून देतात. अर्बस्थानाच्या वाळवंटांत जर गणपतीचें विसर्जन करण्याचा एकाद्या हिंदूस प्रसंग आला तर तो त्यास तेथेंच सूर्याच्या उन्हांत तळमळत टाकून देईल; परंतु त्याची दया मानून आपल्या नियमित दिवसापेक्षां अधिक काळपर्यंत आपल्याजवळ ठेवणार नाहीं. अणखी असें आहे कीं, सर्वांच्या घरीं गणपतीस आमंत्रण मिळतें असें नाहीं, वडिलोपार्जित चाल असली तरच गणपतीस मोदक खायाला बोलावितात, नाहीं पेक्षां आपल्या देवास सोडून स्वस्थ एकटेच जेवितात; केवढीहो ही देवावर भक्ति!

परंतु परमेश्वराची भक्ति ह्या अचेतन मातीच्या गोळ्याचे भक्तीपासून किती भिन्न, किती निर्मळ, पवित्र, म-

नास आनंद करणारी, शरिरास सुख देणारी, सद्गुण व सदाचरण प्रवर्तक व परलोकांचें सुख प्राप्त करून देणारी आहे तिजकरितां असा उधळेपणाचा खर्च नको; तिजकरितां ऋण काढून सण करण्याची गरज नाहीं, त्याची पूजा सांगण्यास द्रव्यलोभी भटांची गरज पडत नाहीं, ती भक्ति करितांना तासे वाजंत्री यांचा कर्कश शब्द ऐकून मस्तक उठवून घेणें नको; एकांतवासांत किंवा मंडळींत असल्यास सर्वत्र शांतता ठेवून आपणास समजेल तस्या भाषेंत ईश्वराचें शास्त्र वाचणें व त्याचा स्पष्टार्थ समजणें यांत किती आनंद आहे! आणि गणपतीची पूजा करितांना भट संस्कृत भाषेंत बडबड करितो तीं यजमानास किमपी समजत नाहीं; त्याच्या मनांत दुसराच विचार घोळत असतो, सारांश कल्पित देवाची पूजा अर्चा व त्यासंबंधी जे उत्साह वगैरे असतात, त्यापासून कांहीं शांती व लाभ नाहीं; ज्या कोणास वाटत असेल कीं, आह्मी गणपती पूजनाने कृतकृत्य झालों, ते फसले जातात ती समजूत केवळ त्यांची आत्मप्रतारणा आहे.

हे माझे प्रिय मित्र हो, वादाचीं प्रमाणें आणून मी ह्या सणाचें खंडण केलें असें नाहीं, तर त्यासंबंधी ज्या खऱ्या गोष्टी आहेत, त्याच लिहिल्या; आतां त्यापासून सारांश काय निघतो, हें आपणासारिख्या कडेस ठेवून हें पत्र संपवितों.

———

## पत्र ७ वें.

### आश्विन मास—दसरा व दिपवाळी.

विनंती विशेष, मागें एक वेळ मी आपणास लिहिलें कीं कित्येक सण प्रतिवर्षीं सुगीच्या दिवसांत आनंद करण्यासाठीं मनुष्यानी स्थापिले आहेत. ह्या महिन्यांत **दसरा** हा सण त्याच प्रकारचा आहे, असें वाटतें. कारण आश्विन मासांत शेतें पिकून नवीन धान्य सिद्ध होतें, व पर्जन्याची समाप्ति होऊन जिकडे तिकडे शेतकरी लोक आनंदी असतात. आणि दसऱ्याचे दिवसीं पागोटींत धान्याचा रोव घालतात व नव्या धान्याचीं पक्वान्नें करून खाण्याची देशावर चाल आहे. परंतु दसऱ्याच्या सणाची दुसऱ्या एक प्रकारावरून निराळीच उत्पत्ती दिसती. ती अशी कीं, विजया दशमीच्या मुहूर्तानें हिंदुस्थानचे राजे पूर्वीं युद्धास निघत; जरी कोठे लढाई नसली, तरी या दिवसीं शहाराबाहेर मोठ्या समारंभानें सैन्य काढून डेरे ठोकीत; यावरून हा सण विजयाचीं चिन्हें व तत्संबंधीं उत्साह दाखविण्यास स्थापिला असावा. तें कसेंहि असो, परंतु हा सण मनुष्याच्या धर्माचरणास मोठा बाधक आहे. यांत जरी कित्येक गोष्टी निर्दोष व मनास क्षणिक आनंद देणाऱ्या आहेत, तरीं बहुतेक गोष्टी परमेश्वराचा अपमान करणाऱ्या व मनुष्यजातीस नीचत्व आणणाऱ्या अशा आहेत; ह्मणून त्यांतून बहुतेक गाळून टाकिल्या पाहिजेत, किंबहुना तो सणच काढून टाकला पाहिजे. त्यांतील वाईट गोष्टी येणेप्रमाणें आहेत.

प्रथम. आश्विन मासास प्रारंभ झाला ह्मणजे **घटस्थापना**

होऊन देवीं **नवरात्रास** प्रारंभ होतो, तेव्हां कोणी-कोणी व विशेषेंकरून ब्राह्मण नवरात्र उपवास करितात. त्यांत जे शाक्तमार्गाचे असतात, त्यांस मद्यमांसाची मोठी रेलचेल होती. त्यांचे शिष्य रात्रंदिवस आपल्या बावास हा फराळ पोहंचवितात. याचप्रमाणें दुसरे ब्राह्मण लोकांस भोंदून उदरनिर्वाह करितात. ते नऊ दिवस मौन्य धरून बसतात, तेथें त्यांस दूध, केळी, बर्फी, पेढे इत्यादि पदार्थ यथेच्छ प्राप्त होतात, व त्यांची देवाप्रमाणें पूजा अर्चा होत असती.

दसऱ्याच्या दिवसीं हातेराची व घोड्याची पूजा करितात. यांत ईश्वराचा मोठा अपमान होतो. परमेश्वराशिवाय दुसरा कोणी पूज्य नसतां दसऱ्याच्या दिवसीं कारकून आपल्या कागदास लेखणीस व शाईस पुजितो. शेतकरी आपल्या नांगरास व आवतास गंधाक्षता लावून त्याच्या पाया पडतो. हजाम आपल्या वस्तऱ्यास देव मानितो. सुतार आपल्या तासणीपुढें नाक घांसतो. सोनार आपल्या आगटीस ‘जयदेवीमाते, माझें कल्याण कर,’ असें ह्मणतो. चांभार आपल्या रापीस पुजून तिला नैवेद्य दाखवितो. या दिवसीं देवीस टोणग्याचा बळी अर्पण करितात; हें मोठें क्रूर कर्म आहे. याप्रमाणें सर्व कारागीर, कसबी, उदमीवगैरे आपल्या उत्पन्नकर्त्यास सोडून दसऱ्याच्या दिवसीं असें अघोर पातक करितात. ह्या मुख्य कारणावरून दसऱ्याचा सण परमेश्वरास संतापविणारा व मनुष्यास नीचत्व आणणारा होय. ह्मणून अशा सणापासून जो आनंद होतो, तो अति दुःखास कारण होय. याविषयीं विशेष विचार लिहिला असता,

परंतु त्याच महिन्यांत दुसरा एक अनिष्टकारक सण आहे, त्याचे दोष कांहीं विस्ताराने दाखविले पाहिजेत.

दुसरा सण दिपवाळी. ही पांच दिवस असती, परंतु बहुत ठिकाणीं या पांच दिवसांत तिजपासून जे अनर्थ होतात, त्यांचा पांच महिने होऊन गेले तरी लोकांस विसर पडत नाहीं, व त्याचें दुःख भोगणें सरत नाहीं. कित्येक ठिकाणीं दिपवाळीच्या पांचां दिवसांत असे अनर्थ होतात कीं त्यांचें दुःख व आठवण पांच पंचवीस वर्षेंपर्यंतहि मनांतून जात नाहीं.

१ दिपवाळीच्या सणांत द्रव्यापव्यय ही हानी होती, व त्यापेक्षां दुसरी मोठी एक असी कीं, सदाचरण व नीती यांस भ्रष्टत्व प्राप्त होतें. दिपवाळी आली ह्मणजे हिंदु लोकांत गरीब लोक कर्ज काढून आपल्या सामर्थ्यापेक्षां अधिक खर्च करितात, व जे सधन आहेत त्यांचा उधळेपणा कोठवर वर्णावा? दररोज दिवसास मेजवान्या व रात्रीस नाच तमासे, गाणें बजावणें, बैठका यांचा कडाका चालला असतो. तेथें ते लोक आपल्या मुलांस जवळ घेऊन बसतात. हाय हाय! त्यासमयीं ते आपल्या लहान मुलांच्या कोमळ हृदयांत विषाचें बीजारोपण करितात. तें पुढें हळूहळू मोठें वाढून शेवटीं त्यांच्या नाशास कारण होतें.

२ दिपवाळींत, मुलांस त्यांचे आईबाप मोठ्या लाडाने फटाके, चंद्रज्योती, नळे, बाण, चिचुंद्र्या इत्यादि, दारूचें सामान आणून देतात, व कित्येक जण आपल्या घरांत दिपवाळीकरितां दारूचा कारखाना करितात; येणेकरून केवळ पैक्याचा व्यर्थ खर्च होतो, इतकेंच नाहीं;

तर त्यापासून मुलांच्या व मोठया मनुष्यांच्या शरीरास मोठमोठे अपाय घडून येतात. त्याचें फळ त्यांस जन्मभर भोगावें लागतें. जे लोक शहरांत राहतात, त्यांस माहित असेल कीं, दारूच्या योगाने प्रतिवर्षी किती मुलांचीं अंगें जळतात, कित्येकांचे डोळे फुटतात, कित्येकांचे हात पाय जळतात, कित्येकांची मुखाकृति कुरूप व छिन्नविछिन्न होती, कित्येकांच्या जिवांस जन्माचे रोग जडतात, व कित्येकांचे प्राणहि जातात. दारूपासून दुसरे उत्पात असे होतात कीं, लोकांच्या घरास आग लागती व त्यांची मालमत्ता जळती, आणि चांगली हुशारी न राखिली तर मनुष्याचे व पशूचे प्राणहि जातात. याप्रमाणें दिवाळीच्या सणापासून अनर्थ होतात.

२ अणखी ह्या सणापासून हानि होती ती असी; दिवाळींत जुगार खेळावा असी हिंदुशास्त्रांत आज्ञा आहे, ती मानून लोक त्याप्रमाणें चालतात, व कित्येक लोक जे नेहमी जुगार खेळत नाहींत तेहि शास्त्रार्थासाठीं हातीं फासा धरावा ह्या निमित्ताने आपलीं मुलें लेंकरें जवळ घेऊन जुगाराचा आखाडा मांडितात. परंतु जे अट्टल जुगारे आहेत, ते तर ह्या सणांत आपल्या दुराचरणाची कोठवर सीमा करितात हें सांगायासच नको. ह्याप्रमाणें दिवाळींत कित्येक लोक आपलें दिवाळें काढून कर्ज बाजारी व भिकारी होतात; हें या सणाचें फळ आहे. दिवाळींत हिंदुलोक आपलें घरदार स्वच्छ करून दिवे वगैरे लावून मोठी आराष करितात. याचें कारण लक्ष्मीने येऊन आपल्या एथें वास करावा व सर्व ठिकाणीं प्रकाश असला ह्मणजे अवदशेस राहण्यास जागा मिळत

नाहीं; मग ती घरांतून निघून जाती, असी त्यांची समजूत आहे. परंतु दिवाळीच्या सणांत जो उधळेपणाचा खर्च होतो, तेणेकरून लक्ष्मी निघून जाती, व अवदसा घरच्याघरींच राहती, अणखी तिच्या बहिणी बाहेरून तिला भेटायास आंत येतात, हें ह्या लोकांस कसें दिसत नाहीं! दुसरें असें कीं लक्ष्मी ह्मणजे धन संपदा इला देवी असें मानून तिची पुजा करणें हें मोठें सदोष कर्म होय. सर्व भांडाराचा अधिपती व दाता ईश्वर आहे. त्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "पृथ्वी ईश्वराची आहे आणि तिजमधील सर्व पूर्णता त्याची आहे." तर त्याजपासीं आपल्या सुखाकरितां व त्याच्या गौरवाकरितां प्रार्थनापूर्वक विनयाने धन संपदा मागणें सोडून धनाचीच पूजा केली असतां ईश्वरास क्रोध येणार नाहीं कीं काय? जे कोणी आपल्या घरांत लक्ष्मी यावी ह्मणून चहुंकडे प्रकाश करण्यास जो श्रम घेतात, तो सोडून आपल्या अंतःकरणांत ईश्वरी ज्ञानाचा प्रकाश पडून तें ईश्वराचा पवित्र आत्मा राहण्याकरितां पवित्र मंदिर व्हावें ह्मणून जर प्रयत्न करितील, तर किती बरें होईल! व त्यानी असें केलें असतां ईश्वरकृपेने त्यांचा हेतू सिद्धीस जाईल. आपल्या मनांत कामक्रोध दुष्ट वासना इत्यादि जीं अवदशेचीं अपत्यें आहेत, तीं निघून जातील. आणि ईश्वरी प्रीति, शांति, सुख, क्षमा, दया, सत्य, हीं धनसंपदा येऊन राहील, व असें झालें ह्मणजे आपल्या घरीं नित्य दिवाळी आली असें समजावें. त्या ईश्वरानिर्मित दिवाळीच्या प्रकाशापुढें ह्या मनुष्यस्थापित दिवाळीचा प्रकाश आकाशांत काजव्याच्या उजेडाप्रमाणें निस्तेज दिसूं लागेल; हीं विनंती.

## पत्र ८ वें.

### होळी.

विनंती विशेष, हा दुष्ट सण पृथ्वींतील सर्व वाईट सणांपेक्षां अमंगळ व अघोरी आहे. होळींत लोक कोण कोणतीं कर्में करितात व होळी हा सण कसा उत्पन्न झाला ह्याचें सविस्तर वर्णन "ज्ञानोदय" नामक वर्तमानपत्र कर्त्याच्या बक्षिसावरून जे दोन ग्रंथ छापिले गेले आहेत, त्यांत लिहिलें आहे. ह्या सणांत हिंदुलोक सर्व गोष्टींची लज्जा सोडून देतात, जसा एकादा वेडा मनुष्य बेशुद्ध असतां आपल्या शरीरावरील सर्व वस्त्रें टाकून रस्त्यांत फिरतो, तद्वत होळींत हे लोक आपलीं सदाचरण व नीतिरूप वस्त्रें टाकून निर्लज्ज व निःसंग रूपवान होऊन फिरूं लागतात. ह्यांचीं आचरणें पशूपेक्षांहि नीच ह्मटलीं तरी त्यांचे नीचत्वास तुळणा आणवत नाहीं. होळी खेळणाऱ्या लोकांच्या गुणाची तुळणा करण्याजोगें नीच असें एकहि जनावर ईश्वराने ह्या पृथ्वीवर उत्पन्न केलें नसेल. घाणींमध्यें लोळणारीं डुकरें व किडे यांचीं शरिरें मात्र मलीन होतात, परंतु ह्या होळीच्या सणांत जे मिसळतात त्यांचीं अंतःकरणेंहि अतिशय अमंगळ होऊन जातात. ज्या खतांत डुकरें वगैरे जनावरें आपलीं शरीरें माखवितात, तें खत मळ्यांतील झाडांस घातलें असतां त्यापासून चांगलीं फळें येतील; पण होळीच्या दिवसांत जो रेंदा लोकांच्या मनावर थापला जातो, तो कांहींच उपयोगी न पडतां त्याच्या दुर्गंधीने इतरांचीं मस्तकें दुखूं लागतात, व त्यापासून माहारोग उत्पन्न होतो. असा हा

होळीचा सण! त्याजपासून लोकांची कोणत्या प्रकारें हानि होती, ती पाहूंया.

"कालाचा अपव्यय ही एक मोठी हानि या सणापासून होती." मनुष्याचें आयुष्य किती अमोल्य आहे. लक्षावधी रुपये दिल्हे असतां व्यय झालेल्यांतून एक पळहि आपणास कोणी परत आणून देणार नाहीं, आणि तें चंचळ किती आहे हें पाहूं गेलें असतां त्याच्या गमनवेगाचें आपल्याच्याने मान करवत नाहीं. बहुत काय सांगावें, पण वायू व तेज जीं सर्व पदार्थांपेक्षां अति चपळ असें विद्येच्या योगानें समजलें आहे, त्यांपेक्षांहि काळाचा गमनवेग मोठा आहे. असें असतां आपण त्याचा किती अपव्यय करितो बरें! आपणास कोणत्या समयीं मरण येईल, याचा भरवसा नाहीं, आणि जर आपण आपलें आयुष्य दुराचरणांत व अधर्मांत घालविलें, तर त्यांत किती तोटा आहे बरे! होळीमध्यें तर लोक आपला कामधंदा सोडून नीच कर्मांत आपलें आयुष्य व्यर्थ खर्चतात. मुलेंहि आपला विद्याभ्यास सोडून आठदाहा दिवसपर्यंत आपलें सर्व मन होळीच्या खेळाकडे लावितात. शिमगा झाला तरी त्यांचें मन त्या खेळांत गुंतलें असतें; तेणेकरून त्यांस झालेल्या अभ्यासाचा विसर पडून पुढें नवे विषय बरावर चालत नाहींत. याप्रमाणें "कालापव्यय" ही मोठी हानि विद्यार्थी मुलांस होळीपासून होती, व तसाच इतर व्यापारी, कसबी व शेतकरी लोकांस होळीपासून तोटा होतो. याविषयीं एथें लिहिलें असतां विस्तार फार होईल.

होळीपासून दुसरी हानि असी आहे कीं, "लोकांची

अब्रू जाती." ही गोष्ट हिंदूंच्या ध्यानीं राहत नाहीं; कारण सर्व जण जर बेशुद्ध होऊन नग्न फिरूं लागले, तर त्यांतून कोणाएकासहि लज्जा वाटणार नाहीं. परंतु कोणी शुद्धीवर असलेल्या मनुष्याने त्यांस पाहिलें ह्मणजे त्यांस त्यांची लज्जा वाटून तो त्यांस हुशार करण्याचा प्रयत्न करितो, त्याप्रमाणें होळीच्या सणामुळें आपली अब्रू जाती, हें आमच्या लोकांस समजत नाहीं; ह्मणून ते ह्या सणाच्या सर्व क्रीडा मोठ्या उत्कर्षाने करितात. त्यांस त्याविषयीं कांहीं लोकलज्जा अथवा ईश्वरभय वाटत नाहीं. "अंगावर चिखल व रेंदा वगैरे फांसून घेणें, अभद्र शब्द बोलून बोंब मारणें, रांडांचे व कसविणींचे नाच तमासे करणें, चोऱ्या छिनाल्या करणें, हें सर्व त्यांस जरी इतर दिवसीं अन्याय, दुराचरण व पातक वाटतें, तरी होळींत हे दुर्गुण सद्गुण असे दिसतात. हीं नीच कर्में त्यांस सद्गुणासारिखीं वाटतात. अहो, परंतु विचार करा कीं, विष, कधीं तरी दूध होतें कीं काय ! लोक ह्मणतात कीं होळींत दुराचरण केलें तरी त्याची आह्मास मोकळीक आहे व त्यांस दुराचरण ह्मणूं नये. तर होळींत तुमच्या घरीं चोराने दरवडा घातला असतां तो तुह्मी दरवडा मानूं नये. खुशाल घरांतील माल चोरास नेऊं द्यावा; कारण होळींतील चोरीस चोरी ह्मणूं नये. दुसरें असें कीं सुवर्णाच्या पिंजऱ्यांत कावळ्यास ठेविलें ह्मणून त्यास कोकिळेचे गुण प्राप्त होतील काय? सणाचा दिवस हाच एक सुवर्णाचा पिंजरा माना, त्यांत दुराचार व दुष्कर्मरूप कावळा ठेवला ह्मणून त्यास सदाचार व सत्कर्मरूप कोकिळेची बरोबरी करितां

येईल कीं काय ? नाहीं. मग होळीच्या सणांत तुह्मी जें करितां त्यापासून तुमच्या अब्रूस व सद्गुणास कळंक कसा लागणार नाहीं ? तेणेकरून परमेश्वराच्या आज्ञांचा कसा भंग होणार नाहीं ? तर हा ओंगळ घाणेरडा सण लोकांची अब्रू घालवितो हें बोलणें निर्विवाद व सप्रमाण आहे.

होळीच्या सणापासून अणखी एक कुफळप्राप्ति असी होती कीं मुलांची नीति भ्रष्ट होती. स्वछंदानें वागण्यास त्यांस आईबापापासून नित्यापेक्षां होळींत अधीक मोकळीक मिळती. ते आपल्या गळ्यांत ताशा बांधून रस्त्यांत वाजवीत फिरतात. त्यावेळीं ते आपल्या वडिलांची मर्यादा राखीत नाहींत. तोंडांतून अनिर्वाच्य अभद्र भाषणें बोलतात. मार्गांतून स्त्रिया जात असल्यास त्यांची निर्लज्जपणें थट्टा व विटंबना करितात; हे सर्व त्यांच्या बापास खेळ वाटतात. पण हेच खेळ पुढें मुलें दुर्गुणी व दुर्व्यसनी होण्यास कारणीभूत होतात. "सुंभ जळतें पण पीळ जळत नाहीं" असी एक ह्मण आहे. तिजप्रमाणें होळीचा सण निघून गेला तरी मुलांचा छंद सुटत नाहीं. लोकांस निर्भिडपणें बोलणें, आईबापांचा मान न राखणें, स्त्रियांची अमर्यादा करणें, चोरी करणें, अमंगल शब्दाचा उच्चार करणें इत्यादि दुर्गुण व नाच तमाशे पाहण्याची आवड इत्यादि व्यसनें त्यांच्या मनांतून जात नाहींत. मनुष्याचें मन स्वभावतः दुष्ट आहे आणि होळीच्या सणांत ज्या पापिष्ट वासना व कल्पना उत्पन्न होतात त्यांचा त्यांस स्वाद लागला, ह्मणजे तें अत्यंत दुष्ट होतें. शिमग्याच्या दिवसांत अंगावर रंग घेतात तेव्हां त्या प्रसंगीं प्रत्येक जातींतील हिंदुलोक आपापल्या देवालयांत रांडा नाचायास आणि-

तात, व तेथें आपल्या जाति गृहस्थांस आदर मानानें आमंत्रून मग त्यांच्या अंगावर गुलाल व रंग टाकितात, आणि त्या पातकी रांडांच्या अंगावरहि ते लोक निलाजरेपणानें रंग व गुलाल उडवून त्यांजबराबर थट्टा मस्करी करितात, व अमंगळ भाषाणें बोलून आपलें तोंड घाणेरें करितात. मला वाटतें कीं अशा प्रकारच्या ठिकाणीं जाण्याकरितां जर कोणी कोणावर जुलूम केला, तर त्यानें शौचकूपांत जाऊन घटकाभर बसून तेथें जाणें चुकवावें, परंतु त्या अपवित्र व अमंगळ ठिकाणीं जाऊं नये. पहिल्या ठिकाणीं कांहीं वेळ दुर्गंधी येऊन शरिरासच विकार होईल, पण दुसऱ्या ठिकाणीं जी दुर्गंधी येती, तिने मनास व आत्म्यास महारोग होऊन त्याचें दुःख इहपर उभयलोकीं, भोगावें लागेल.

सारांश हा होळीचा सण अतिदुष्ट आहे; यापासून कुटुंबांत फार हानि होती; ह्मणून यांतील सर्व वाईट चाली व रीती बंद केल्या पाहिजेत. या विषयांवर मागें सांगितले जे होळीविषयीं दोन ग्रंथ ते सर्वांनी वाचून पाहावे आणि त्याविषयीं विचार करावा. होळीचा सण आला ह्मणजे सर्व हिंदु लोकानी आपापल्या मुलांस ते ग्रंथ वाचायास द्यावे. गुलाल, रंग वगैरे जिनसा घेण्यांत व्यर्थ खर्च करण्यापेक्षां हीं अल्पमूल्य व बहुगुणी होलिकाछेदक शस्त्रें त्यांच्या हातीं द्यावीं ह्मणजे त्या सणांत जे दुर्गुणादि राक्षस आपल्या देशांतील मनुष्यें भक्षण करायास व त्यांची संपति लुटायास येतात त्यांजपासून ते आपलें रक्षण करितील व दुसऱ्यास बचावण्याचा प्रयत्न करितील. जर सर्व लोक हीं शस्त्रें आपल्या हातांत बाळगितील व त्यांचा

उपयोग करायास शिकतील, तर या होळिका राक्षसीचें प्राबल्य न चालून ती एथें प्रवेश करणार नाहीं. मग सर्व देश निर्भय होऊन सुखाने व आनंदाने नांदेल.

---

## पत्र ९ वें.

वृतें, उपवास व सण यांजवर साधारण विचार.

विनंती विशेष, आजपर्यंत आपणास जीं पत्रें पाठविलीं व त्यांत जो विचार लिहिला, तो वाचून हिंदुलोकांचे सण कोणत्या प्रकारचे आहेत ह्याविषयीं आपली बरीच समजूत झाली असेल. परंतु त्याप्रमाणें सर्व सणासंबंधी विचार लिहिणें अशक्य आहे, कारण सणांची याद भटांच्या पंचांगांत पाहून भय वाटतें. असो, परंतु जरी सर्व सणांचें व्याख्यान न झालें तरी जे मुख्य मुख्य आहेत त्याविषयीं म्या यथामति निरूपण केलें तथापि त्यांत व्रतें व उपवास यांचा फारसा संबंध दाखविला नाहीं; आणि ह्या व्रत व उपवासाची संख्या पुष्कळ असून त्यांपासून लोकांच्या स्थितीवर इतका वाईट परिणाम झाला आहे कीं, त्यांतील सर्व दोष दाखविण्यास एक निराळाच ग्रंथ रचिला पाहिजे. परंतु ज्या अर्थीं कोणी व्रतें व उपवास यांची सणांत गणना करितात, त्या अर्थीं त्यांवर कांहीं विचार लिहून आपणास कळवितों.

१ व्रतें व उपवास केल्याने ईश्वरसेवा घडती किंवा पुण्य प्राप्ति होती, असी जी लोकांची समजूत आहे, ती खोटी. व्रत उपवास इत्यादि करितां वेळीं कोणाच्याहि मनांत

ईश्वराची प्रीति किंवा त्याविषयीं मान्यता, परोपकार बुद्धि आपल्या कर्माची न्यूनता ईश्वरावर भरवसा व पापाची क्षमा मिळविण्याची कळकळ, यांतून एकहि उत्पन्न होत नाहीं.

२ सण उपवास व व्रतें करण्याचे दिवस आले ह्मणजे त्या दिवसीं काय करावें, काय खावें, हा विचार जिकडे-तिकडे होत असतो. घरांत पैसा नसला तर सणाक-रितां कर्ज काढितात. एकादशी शिवरात्रि श्रावणी सोमवार इत्यादि उपवास करण्याचे पडले ह्मणजे त्यांच्या आदल्या दिवसीं असा बेत होतो कीं, उपासाचे फळारास काय खावें ? कोणी ह्मणतो केळी, कोणी ह्मणतो दुध, कोणी बर्फी; याप्रमाणें बेत करण्यांत दिवस जातो. बरें नंतर दुसरा दिवस आला ह्मणजे पुनः असा विचार चा-लतो कीं, उद्यां पारणें सोडायाचें तर काय पक्वान्न करावें किती भाज्या आणाव्या, अशा खाण्या पिण्याच्या कल्प-नेंत त्यांचें मन गुंतलें असतें.

३ व्रत उपवासादि मोठ्या आवडीनें व निष्ठेनें करणारे असे फारच थोडे, ह्मणजे शंभरांत पांच मिळणें कठीण. बहुतेकांस हीं व्रतें उपोषणें त्यांजवर कर बसविल्याप्रमाणें आहेत, त्यांस त्यांचा कंटाळा येतो, हें त्यांच्या वर्तणुकेवरून दिसतें. तें असें कीं, त्या दिवसीं ते पोटभर फराळ करितात, किंवा सोजी ह्मणजे तांदुळ भाजून त्याचा भात करून खा-तात,अथवा भटास पैका देऊन त्याकडून उपोषण करवितात. दुसरें असें कीं, जे पुष्कळ लोक आपणास धार्मिक ह्मणवितात, तेहि वर्षांतून दोन महा एकादशा ह्मणजे आषाढी आणि कार्तिकी. श्रावण मासांतील सोमवार. माघ मासांतील शिव-

रात्रीं एवढे मात्र उपास करितात, आणि नित्याचे बारमाही उपवास गुंडाळून ठेवितात. हीं व्रतें करितांना बहुतांच्या तोंडांतून असे शब्द निघतात कीं, मला उपास लागला, घेरी आली; माझें पित्त खवळलें; माझें डोकें दुखूं लागलें, मला सोस लागला, माझ्या जिभेस कोरड पडली, इत्यादि.

उपासांचा व व्रतांचा लोकांस त्रास आहे, याची दुसरी खूण असी आहे कीं, तो दिवस लवकर जावा ह्मणून कांहीं तरी खेळ, गंजीफा, सोंकट्या इत्यादि काढितात, दुसरे कित्येक बिछाना पसरून स्वस्थ झोंप घेतात. तर अशा प्रकारचे वर्तणुकीवरून लोकांस ह्या व्रत उपोषणांचा किती कंटाळा आहे हें स्पष्ट दिसून येतें. ती केवळ त्यांच्या डोईवर मोठीं जड ओझीं किंवा त्यांच्या गळ्यांत भारी शिळा बांधिल्याप्रमाणें आहेत. असें असून लोक बैलाप्रमाणें निमुटपणें सर्व ओझें सोसून आपल्या आयुष्याचे दिवस काढितात.

४ व्रतें, उपवास व सण आले ह्मणजे त्या दिवसीं कोणत्या रितीने व कसें वागावें, हा विचार कधीं कोणाच्या मनांत येत नाहीं. जर ते सण ईश्वरस्थापित आहेत, तर जेणेकरून ईश्वराचा थोरपणा दिसून येईल व मनुष्याचें कल्याण होईल, अशा प्रकारें त्या दिवसीं आपलें आचरण ठेवावें व लोकांस त्याचा कित्ता द्यावा असें ब्राह्मणानी करावें; तें सोडून हे ब्राह्मण सण व उपवास येण्याच्या पूर्वींच दोन चार दिवस आपापल्या यजमानाच्या घरीं जाऊन सोमवारीं एकादशी, मंगळवारीं प्रदोष, बुधवारीं शिवरात्र, शनवारीं अमावास्या, इतकें मात्र ओ-

रडून सांगतात; परंतु असें ह्मणत नाहींत कीं, 'हे लोकहो, परवां अमकें व्रत आहे, यास्तव तुह्मी नीट जपून वागा, असत्य भाषण, व दुराचरण करूं नका, मनांत कुकल्पना आणूं नका, आपल्या अपराधाविषयीं परमेश्वरापासीं क्षमा मागा; लीनता धरा व सद्भावेंकरून त्यास शरण जा.'

सण आला ह्मणजे भट दारोदार तांदुळ, डाळ, तूप, गुळ, नारळ, सुपाऱ्या, पानें, पैसे, हे गोळा करण्याकरितां फिरतात. त्या दिवसीं त्यांस अतिशयच लोभ उत्पन्न होतो. यजमानाचे गूण कितीहि दुष्ट व त्यांचीं कर्मे कितीहि भ्रष्ट असलीं तरी त्याची त्यांस चिंता नसते. यावर एक ह्मण असी आहे कीं "नवरा मरो कीं नवरी मरो दक्षणा मिळाली ह्मणजे झालें" दुसरी ह्मण– "गरज सरो आणि वैद्य मरो." आपणास यथास्थित शिधा व दक्षणा मिळाली ह्मणजे झालें; मग दुसऱ्या गोष्टीची त्यांस कांहीं काळजी नसती. आपल्या धर्माप्रमाणें तरीं स्नान संध्या जपादि करण्यांत भटानी बसावें, तें सोडून त्या दिवसीं त्यांचें सर्व ध्यान मन शक्ति बुद्धि, रुपये अधेल्या पावल्या चवल्या, अर्ध्या मिळविण्यांत निमग्न झालें असतें. जर कोणी एकादें व्रत किंवा उपवास केला नाहीं, तर मात्र भट त्याची निंदा करितील; तो केल्यापासून जे अनर्थ उत्पन्न होतात व त्यांत जे दोष आहेत त्यांविषयीं त्यांस कांहीं काळजी वाटत नाहीं.

९ बायकांचीं जीं व्रतें व उपवास आहेत तेणेंकरून त्यांस अगदीं नीचत्व प्राप्त होतें, इतकेंच नाहीं; तर परमेश्वरावरून त्यांची श्रद्धा उडती. त्यांच्या व्रतांत सर्व

पोरखेळ व पळपळीतपणा असून त्यांच्या ठाईं वृथाभय अथवा मिथ्या आनंद उत्पन्न करण्याची प्रवृत्ति आहे. पाहा, त्यांचीं व्रतें किती पोरकट, हलकीं व अर्थहीन आहेत! वटसावित्री आली ह्मणजे वडाच्या झाडाची पूजा करावी, ऋषीपंचमीच्या दिवसीं बैलाच्या श्रमाने उत्पन्न झालेले पदार्थ खाऊं नये, वर्णषष्ठीचे दिवसीं भटास वालदान द्यावें, तसेंच अमक्या दिवसीं अमकी भाजी खावी, अमक्या रोजीं मत्स्य खाऊं नये, अमक्या रोजीं पाणी पिऊं नये[२]; अमक्या व्रतास एक वेळ जेवावें.[३] अमक्या रोजीं पानसुपारी खाऊं नये.[४] अमक्या रोजीं मिठ[५] किंवा भात खाऊं नये.[४] अमक्या रात्रीं निजूं नये.[६] अमक्या दिवसीं उभेंच राहावें.[७] अमक्या रोजीं कोणासीं बोलूं नये.[८] अमक्या महिन्यांत गाईच्या शेणांत जें धान्य मिळेल, तेंच खावें.[९] अमक्या रोजीं कापसाच्या वाती तुपांत भिजवून जाळाव्या.[१०] अमक्या रोजीं गव्हाचा रोटच खावा,[११] अमक्या रोजीं थंड पाण्याने अष्टोत्तरशें अंघोळी कराव्या.[५] इत्यादि अनेक प्रकारचीं निरर्थक व कंटाळवाणी कर्में करण्यांत बायकांचा सर्व जन्म खर्चतो. त्यांत नीति किंवा कोणताहि सद्गुण प्राप्त होण्याची अथवा परमेश्वराची दया, प्रीती,

---

१ चंपाषष्ठी.
२ श्रावणमासांत ब्राह्मण, वाणी यांशिवाय जे मत्साहारी असतात ते खात नाहींत.
३ पिठोरी.
४ एकादशी.
५ ऋषीपंचमी.
६ हरितालिका.
७ संकष्टचतुर्थीचें वृत कोणी कोणी याप्रमाणें करितात.
८ मुकामहात्म.
९ चातुर्मासांत कोणी करितात.
१० महाशिवरात्र.
११ श्रावणी सोमवार.

न्याय इत्यादि गूण दिसून येण्याचीं कांहींच चिन्हें नाहींत.

६ बरें जे कोणी पुरुष व स्त्रिया यथाशास्त्र व्रतादि नेम पाळतात, त्यांस तरी काय फळ प्राप्त होतें ? दंभ व गर्व हे दोन दुष्ट गूण त्यांच्या मनांत सर्वदा वागत असतात. हेंच काय तें त्याचें फळ. मी अमकीं व्रतें केलीं व अमुक उपास केले ह्मणून मला इतकें पुण्य मिळालें मजसारिखा पवित्र व पुण्यवान कोणी नाहीं ; असा अभिमान मात्र प्राप्त होतो.

७ व्रत उपवासाविषयीं एक विलक्षण नियम असा आहे कीं तीं सर्वांस सारिखीं पाळावीं लागत नाहींत, कोणी आपलें कांहीं काम झालें असतां अमुक व्रत आचरूं लागेन, असे नवस करितात, व तेव्हांपासून ते व्रत चालवूं लागतात. गणेशचतुर्थी, ऋषीपंचमी, संकष्टचतुर्थी, शिवरात्र, अनंतचतुर्दशि इत्यादि व्रतें बहुधा नवसाचीं असतात ; व दुसरा एक चमत्कार असा कीं, त्यांस पाहिजे तेव्हां तीं सोडितां येतात. परंतु ते असा विचार करीत नाहींत कीं, जर हीं सर्व व्रतें ईश्वरआज्ञापित आहेत, तर तीं स्वेच्छेनुसार कसीं पाळावीं ? मनुष्य जन्मास येतांच तीं त्यास लागू व्हावीं. परंतु एथें असी गोष्ट नाहीं. कोणी मुलगा आठ, दाहा वर्षांचा होईपर्यंत कांहींच व्रत करीत नाहीं. कोणी आपलें लग्न झालें ह्मणजे अमकें व्रत धरितो ; कोणी आपणास मुलगा झाला ह्मणजे अमक्या देवाच्या नांवें उपास करितो ; कोणी आपणास धंदा रोजगार लागला ह्मणजे व कोणी आपली बायको मेली ह्मणजे कांहीं व्रतें बंद करितो कोणी बायका पति

मरण पावला ह्मणजे कित्येक व्रतें सोडितात, व नवीन धारण करितात. कायहो हा विलक्षण धर्म! ईश्वरदत्त आज्ञा पाळण्याची ही रीत नव्हे, मनुष्यास बरें वाईट, आपलें दुसऱ्याचें समजूं लागलें ह्मणजे तेव्हांपासून त्याच्या सर्व जन्मांत कोणत्याहि अवस्थेंत व कोणत्याहि काळीं त्यास ईश्वराज्ञा सारिख्याच आहेत; त्याचा धर्म व सदाचरण कधीं बदलत नाहींत. परंतु ह्या व्रतांची गोष्ट, जोंपर्यंत खायास न मिळेल, तोंपर्यंत लबाडी बोलून पोट भरावें, व द्रव्य असलें ह्मणजे लोकांस सदाचार दाखवावा; किंवा जोंपर्यंत कोणी दाता आपणास देईल तोंपर्यंत त्याचें अर्जव करावें, आणि त्याने हात आटोपला ह्मणजे मग त्याचें तोंड पाहायासहि जाऊं नये, याप्रमाणें आहे.

८ ह्या व्रत उपवासांपासून व सणांपासून अणखी एक हानी अशी होती कीं, सर्वकाळ मनुष्याचें मन इहलोकींच्या संसारसंबंधी वस्तूंत गुंतलें जातें. एकाद्या व्रताची फळश्रुति भटास विचारिली ह्मणजे लागलेंच "सप्तजन्म भवेद्राज्यं सौभाग्यें चैव वर्द्धते" इत्यादि मोठ्या मनःकल्पित गोष्टी सांगून मनुष्याचें चित्त सदाकाळ ह्या पृथ्वीवरील नाशवंत सुखाकडे गुंतवितात. बरें, जेथें स्वर्गप्राप्तीचें फळ सांगितलें आहे, तेथें तरीं एक ठिकाण आहे कीं काय? एका व्रताचें फळ वैकुंठवास, दुसऱ्याचें कैलास, तिसऱ्याचें ब्रह्मलोक, चौथ्याचें इंद्रलोक, पांचव्याचें सूर्यलोक, तर सातव्याचें भलताच लोक; असीं नानाप्रकारचीं स्वकपोल कल्पित फळें भट सांगतात. तर व्रत करणाऱ्या बिचाऱ्या स्त्रीने किंवा पुरुषाने आपली आशा कोणत्या लोकीं ठेवावी व कोणत्या देवाची विशेष भक्ति करावी

एकाची केली व दुसऱ्याची न केली तर त्यास राग येतो. आणि भट त्यास ह्मणतो कीं, जर तुह्मी व्रतें न कराल, तर "सप्तजन्म भवे वंध्या वैधव्यं जन्मजन्मनी ॥ दारिद्र्य पुत्र शोकंच कर्कशा दुःख भागिनी ॥ पच्यते नरके घोरे नोपवासं करोतिया ॥ याप्रमाणें तुह्मी फळ पावाल.

९ परंतु उपवासादिक करून दुसऱ्या गोष्टींत आपलें आचरण कसेंहि ठेविलें तरी त्याविषयीं भट एक शब्दहि बोलणार नाहीं. तुह्मी असत्य भाषण बोला; चोरी करा; लोकांस शिव्या द्या; सरकारचा पैका खा; गोर गरीबाकडून लांच घ्या; खोटी साक्ष व खोटी शपथ द्या; व्यापारांत ठकबाजी करा; परमेश्वराची आठवणहि करूं नका; त्याविषयीं तुह्मी भटाच्या दृष्टींत दोषी नाहीं; परंतु जर तुह्मी वर्षप्रतिपदेस कडू निंब न खाल अथवा श्रावण सोमवारीं सकाळीं जेवाल किंवा महा एकादशीस अन्न खाल अथवा श्रावणी पौर्णिमेच्या दिवसीं शेण न खाल व गोमूत्र न प्याल, व दिवाळीचे दिवे न लावाल व होळीची बोंब न ठोकाल, तर मात्र तुह्मी कर्मभ्रष्ट धर्महीन जातिहीन, पाखांडी, असे ठरले जाल. हे माझे मित्र हो, पाहा काय ही नीति व कोणत्या प्रकारचा हा धर्म. तर यावरून असें समजावें कीं, सर्व व्रतें, उपवास व सण हीं पापाची व दुराचरणाची वृद्धि करितात.

१० **गंगाधर शास्त्री** फडके यानीं केलेल्या हिंदुधर्म तत्व नामक पुस्तकांत नवव्या अध्यायीं असें लिहिलें आहे कीं, "जयंती व्रतें एकादशीव्रत, वटसावित्री हरितालिका, ऋषी पंचमी, अदुःख नवम्यादि व्रतें, चातुर्मासांत अनेक प्रकारचे नियम व व्रतें, नित्यशः तुलशी पूजा, बाळ-

कृष्ण पूजा याप्रमाणें स्त्रियांस अनेक निमित्ताने ईश्वर भजन लाविलें आहे. अशा सर्व कृत्यांपासून स्त्रियांस ईश्वरभजन पूजनादि घडून आनंदहि प्राप्त होतो." ह्या लिहिण्यावरून त्या पुस्तककर्त्याचें ईश्वरी धर्माविषयीं व ईश्वराची भक्तीकरून कृपा संपादन करून घेण्याच्या साधनाविषयीं किती अज्ञान आहे, हें स्पष्ट समजतें. ज्या स्त्रियेस व्रतादिकांच्या योगाने ईश्वर भजन घडतें, जीने प्रतिवर्षी चतुर्मासांत गाईच्या शेणांत सांपडलेल्या धान्याचें भक्षण करून व वेळोवेळां ब्राह्मणाच्या अंगुष्ठाचें तीर्थ प्राशन करून आपला देह शुद्ध केला आहे, जीने सर्व तीर्थयात्रा केली आहे, व जी सर्वदा तुळशीपूजा बाळकृष्ण पूजा इत्यादि कर्मांत आपला काळक्षेप करिती, तिला धर्माविषयीं जर हे पुढील प्रश्न विचारिले, तर तिच्याने त्यांतून एकाचेंहि समर्पक उत्तर देववणार नाहीं. ते प्रश्न असे;

१ बाई आपण आजपर्यंत बहुत व्रतें व उपास केले व पुष्कळ तीर्थें हिंडून आलां, तर त्यांपासून आपणास काय लाभ झाला? २ तुमच्या पापाविषयीं तुह्मास काय वाटतें? ३ तुह्मी सर्व दोषांतून मुक्त झालां कीं काय? ४ तुह्मास आपल्या पापाचा पश्चात्ताप कधीं तरी उत्पन्न झाला होता कीं काय? ईश्वर किती पवित्र व न्यायी आहे, याचा तुह्मी कधीं विचार केला होता कीं काय? ईश्वराच्या सर्व आज्ञा तुह्माकडून पाळल्या जातात कीं काय? ६ आपणाकडून त्याच्या आज्ञा भंग झाल्या असतां किती दोष लागतो, हें आपणास माहीत आहे कीं काय? ७ दान धर्म केल्याने मनुष्य पुण्यवंत होतें कीं काय? ८ तुमचीं कर्तव्य कर्मे तुह्मास अवगत आहेत कीं काय? ९

आपण ईश्वराचीं व मनुष्याचीं कोणतीं कर्तव्य कर्में लागतों, हें तुह्मी जाणतां कीं काय? १० अपुर्तेपणी मनुष्यानीं ईश्वराची आज्ञा पालन केली असतां तो ती मान्य करील कीं काय? ११ जर तो आपल्या लोकांकडून अपुर्ते आज्ञांकितत्व मान्य करील, तर त्याच्या राज्यांत काय अव्यवस्था होईल? १२ सेवेची योग्यता कशाने अधिक वाढती? १३ अपराधाच्या दोषाचें महत्व कसें मोजलें जातें? १४ आपणापासून ईश्वराची निष्पाप सेवा घडली असें जरीं कल्पिलें, तरी त्या सेवेची योग्यता किती अल्प आहे? १५ आणि आपल्या पापाचा अपराध किती आहे? १६ आपलीं सर्व चांगलीं कर्में एका पारड्यांत घालून दुसऱ्या पारड्यांत आपला एक अपराध घालून तोल केलें, तरी कशाचें वजन अधिक होईल?

याप्रमाणें जर प्रश्न विचारिले, तर तिच्याने कांहींच प्रमाणपूर्वक उत्तरें देववणार नाहींत. आणि हें उघडच आहे कीं, जिने आपल्या सर्व जन्मांतहि ईश्वराची प्रार्थना केली नाहीं, त्याचें शास्त्र वाचलें नाहीं, सृष्टींतील कृत्यांकडे पाहून कधीं विचार केला नाहीं, त्यांपासून बोध घेतला नाहीं, तीं कृत्यें आपल्या कर्त्याचें चांगुलपण, दया, प्रीति, थोरपण, वैभव दाखवितात असें कधीं मानिलें नाहीं: तिला लक्षावधि व्रतें व प्राण जाईतोंपर्यंत उपोषणें घडलीं तरी काय फळ प्राप्त होणार आहे?

जिने भटाचे पाय धुण्यांत, दगड, झाडें, पशु, सर्प यांची पूजा करण्यांत व गांवोगावच्या नद्यांच्या व कुंडाच्या पाण्यांत शरीर धुण्यांतच आपला सर्व जन्म घालविला, तिच्या ठायीं परमेश्वराविषयीं प्रीति व श्रद्धा आणि

इतर जनाविषयीं प्रीति व उपकार बुद्धि आणि अंतःकरणांत शांति तृप्ति व धन्य अमरत्वाची आशा हीं कोठून प्राप्त होतील ? परलोक संबंधी ज्या आत्मरूपी वस्तू त्यांकडे तिचें चित्त कसें लागेल ? जीं व्रतें व उपवास केले असतां धन धान्य पुत्रपौत्र सौभाग्य सप्तजन्मपर्यंत अखंड राज्यलक्ष्मी इत्यादि ऐहिक सुखाचा उपभोग मिळण्याची मनुष्य मुखोद्गत वचनें मिळतात, त्यांपासून हिंदु धर्मतत्व कर्त्याच्या मताप्रमाणें ईश्वरभजन कसें घडेल ?

याप्रमाणें स्त्रियांस व्रतउपवास केल्याने कांहीं लाभ प्राप्त होत नाहीं, हें सिद्ध झालें. आणि सणाविषयीं जो माझा साधारण विचार होता, तोहि आपणास कळविला. आतां पुढें आपणास एक शेवटलें पत्र पाठवून हा सर्व विषय समाप्त करितों, ही विनंती.

---

## पत्र १० वें.

विनंती विशेष, मागें लिहिल्याप्रमाणें आपणास हें शेवटील पत्र पाठवितों. यांत पूर्वीं जे आपले विचार झाले आहेत, त्यांचा सारांश व सणांच्या योगाने हिंदु लोक कोणकोणत्या लाभास मुकले आहेत, या विषयांचें निरूपण केलें आहे.

१ हिंदु लोकांचे सण बहुत असल्यामुळें त्यांचा बहुत काळ व्यर्थ जातो ही एक मोठी हानि होय. जीं मुलें व मुलीं विद्याभ्यास करितात, त्यांस सणामुळें वारंवार घरीं राहावें लागतें. तेणेकरून त्यांचें मन सतत आपल्या अभ्यासाकडे लागत नाहीं; तीं जें शिकलीं असतात, तें

वारंवार विसरतात; त्यांची सर्वदा खेळावर आवड असून सुटीचे दिवस केव्हां येतील, असा त्यांस निजध्यास लागतो; तर हे अनर्थ चुकवावयास सण अवश्य कमी केले पाहिजेत. कोणास वाटेल कीं यांत कांहीं मोठी हानी दिसून येत नाहीं, तर त्यानीं याविषयीं विचार करून पाहावें जर देश समृद्ध व सुखी झाला पाहिजे, तर त्यांतील लोक विद्वान व सुशिक्षित झाले पाहिजेत, ही गोष्ट निर्विवाद आहे, आणि असें होण्याकरितां देशांतील मुलें व कन्या विद्वान झाल्या पाहिजेत, तसें न झालें तर अनर्थ होईल.

२ सण व्रतें व उपवास पुष्कळ असल्यामुळें आळसाची वृद्धि होती, व लोकसुधारणा कांहीं होत नाहीं. एथें कोणी असी शंका काढतील कीं, "आह्मी ईश्वर सेवेंत सर्वकाळ घालविला तरी काय चिंता आहे? जेवढे सण, व्रतें व उपवास अधिक असतील, तेवढें आमचें मन ईश्वराच्या ठायीं अधिक लागतें." ह्या शंकेचें निवारण बहुतकरून मागल्या पत्रांत झालेंच आहे. ह्मणून एथें इतकेंच लिहितों कीं; ईश्वराचें भजन करण्याची ही पद्धती नव्हे. तें तर नित्यशः केलेंच पाहिजे, व तेणेकरूनच सर्वांचें कल्याण होतें. ह्या सणांपासून सर्व कामास अडथळा पडतो. पाहा एक सण आला ह्मणजे सर्व कसबी कारागीर लोक आपापलीं कामें आटोपून रिकामटवळ्यासारिखे गाव भटकत फिरतात; सरकारचीं कामें बंद होतात; विद्यार्थ्यांचें शिकणें बुडतें; व्यापाऱ्यांचा उद्योग राहतो. आणि हजारो लोक याप्रमाणें रिकामे बसले ह्मणजे किती हानि होती हें सांगवयासच नको.

३ निरनिराळे सण व उपवासाचे दिवस वैगरे यांपा-

सून लोक भलभलत्याच उद्योगास लागतात व जेणेकडून कांहीं लाभ नाहीं अशा पदार्थांचा उपज करण्यांत व खर्च करण्यांत त्यांचा श्रम व पैका व्यर्थ जातो. होळीच्या सणाकरितां गुलाल, व साखरेचीं पदकें पळसाच्या फुलाचा, व कुसंबी, गुलाबी रंग इत्यादि जिन्नस उत्पन्न करण्यांत किती माणसें आपला अमोल्य वेळ घालवितात! व हे जिन्नस विकत घेऊन लोक आपला पैसा उगाच उकिरड्यावर टाकितात. **दिवाळीच्या** सणांत फटाके, नळे, चंद्रजोती, वगैरे दारू, व नाच बैठका करण्यांत दिव्याचें तेल यांचा फुकट खर्च होऊन पैशाची राख होती. **गणपतीच्या** सणांत गणपतीसाठीं माती, रंग, सोनेरी, रूपेरी किंवा तांब्याचा वर्ख, आराष करण्यासाठीं मखर पालखी तासे वाजंत्री, कसबिणी कळवांतिणी इत्यादि आणण्यास खर्च किती लागतो! गरिबाच्या एक रुपयापासून तों श्रीमंताच्या पांचशापर्यंत खर्च होत असतो. याशिवाय रामनवमी, नागपंचमी, गोकुळ अष्टमी, विजया दशमी इत्यादि सणांतहि बराच खर्च होतो. तसेंच बायकांच्या व्रत उपवासांत भटास शिधे देण्याकरितां डाळ, तांदूळ, तूप, गूळ, कणीक, भाजीपाला, नारळ, केळीं, पान सुपारीं सुपें कांकड्या आंबे इत्यादि पदार्थांचा खर्च, व त्याशिवाय नवीं व्रतें चालू करतांना किंवा जुनीं जीं व्रतें असतील त्यांचें उद्यापन करतांना भटांस पुष्कळ दक्षणा द्यावी लागती. अबीर, बुका, कापूर, उद, उदबत्या, नाडे, फुलें इत्यादि दुसरे पुष्कळ जिन्नसांच्या खर्चाचा आकार पाहूं गेलें असतां रकम फार मोठी वाढती. तर हा इतका पैसा जो पाण्यांत टाकावा, त्याचा चांगल्या ठिकाणीं कां

उपयोग करूं नये ? जर हाच पैका एका ठिकाणीं जम-वून लोकोपकारक कृत्याकडे ह्मणजे खेडे गावांत गरीब कुणबी वगैरे यांच्या मुलांकरितां शाळा स्थापिली आणि तेथें एक लहानसें पुस्तकगृह स्थापून एक दोन वर्त्त-मान पत्रें आणविलीं तर लोकांचें केवढें हित होईल ? तसेंच कित्येक गावांत पाण्याची कमताई असती, तेथें वि-हिरी व वाटसरास धर्मशाळा व रोग्यांस औषधछत्र, अंध, पंगू, रक्तपीतीचे, दरिद्री, शक्तिहीन, वृद्ध यांक-रितां अन्नछत्र घातलें असता ते लोक किती सुखी हो-तील ? आळशी, धष्टपुष्ट, गर्विष्ट व सदां बुभुक्षित अशा भटांस देण्यापेक्षां हें किती बरें ! त्यापासून देश सुधा-रून खर्चलेल्या पैक्याची बहुत दिवसपर्यंत सर्वांस आठ-वण राहील इतकेंच नाहीं; तर त्याचा उपभोगहि बहु-तांस होईल. व्रत उपवासापेक्षां अशा प्रकारचीं कर्में करणें हा आपला धर्मच आहे. ईश्वराने आपणास बुद्धि, विद्या, द्रव्य शक्ति दिल्ही आहे, तिचा जर अशा उपयुक्त कार्या-कडे व्यय केला नाहीं, तर त्यांत काय अर्थ आहे ?

४ सण व व्रत उपवास यांपासून शरीर प्रकृति बिघ-डती, हें आपणास मागें एका पत्रांत सुचविलें आहे. सण आले ह्मणजे खाण्यापिण्याचा बेत राहत नाहीं. गोरग-रीब ज्यांस नेहेमी चांगले पदार्थ खायास मिळत नाहींत, ते अधाशीपणाने फार खातात आणि नंतर रोगी होऊन पडतात. सणाच्या दिवसांत दारूचा पुष्कळ खप होतो; आणि दारूपासून जे अनर्थ होतात, ते कोठवर वर्णावे ? सणाच्या दिवसांत मुलांच्या आंगावर दागीने घातल्याने कधींकधीं बहुत अनर्थ घडतात, हा विचार कोणी करीत

नाहीं. परंतु सूक्ष्म रीतीने पाहूं गेलें असतां ह्या अनर्थास सणच कारण होत.

९ आतां सणांविषयीं अणखी एक सांगणें हेंच आहे कीं, ज्या उद्देशाने ईश्वराने बुद्धिवंत मनुष्य प्राणी उत्पन्न केला, तो उद्देश हे सण पाळून त्याच्या हातून सिद्धीस जात नाहीं; हें मी आपणास प्रत्येक पत्रीं वारंवार लिहिलेंच आहे त्याविषयीं विशेष काय ल्याहावें? हिंदू लोकांस ईश्वराविषयीं व त्यांच्याविषयीं कोणी सांगूं लागलें ह्मणजे त्यांस वाटतें कीं, हे आमचा धर्म बुडवूं पाहतात. परंतु मी त्यांस विचारितों कीं, "धर्म ह्मणजे काय? ईश्वरास सोडून अन्य पदार्थास ईश्वररूप मानून भजणें व त्यांची पूजा करणें हा धर्म काय?" तर असें नव्हे. परमेश्वराचीच प्रीतियुक्त सेवा व भजन करणें हाच धर्म होय, आणि या धर्माप्रमाणें सर्वांनी चाललेंच पाहिजे; यास्तव सण व व्रत उपवास केल्याने हा धर्म पाळला जात नाहीं, हें उघड आहे.

१० दुसरी एक दुःखकारक गोष्ट असी आहे कीं, हिंदु लोकांस त्यांचे जे सण आहेत तेवढे पुरत नाहींत, ह्मणून अन्यधर्मी जे मुसलमान लोक त्यांचेहि सण ते पाळितात. मोहरम महिन्यांत ताबूताची व उरसाच्या दिवसांत पिराची भक्ति करण्यास पुष्कळ हिंदु लोक जात असतात. अरेरे, गरीब बिचारे हे लोक! त्यांस तेतीस कोटी देव असतांहि अणखी परधर्मी लोकांचे देव असावे असें वाटतें. त्यांची अझून तृप्तीच होत नाहीं. याचें कारण असें कीं, जसें एकाद्या मनुष्याने कितीहि वायूभोजनें केलीं, तरी त्याची क्षुधा शांत होत नाहीं; त्यास

सरस अन्नाचाच आहार पाहिजे. तसें हे लोक खरा व जीवंत असा जो परमेश्वर त्याचीच जेव्हां भक्ति करितील तेव्हांच ते तृप्त होऊन इकडे तिकडे क्षुधाक्रांताप्रमाणें कल्पित देवांपासीं जाणार नाहींत.

७ व्रत उपवास करण्याने ईश्वराची प्रीती व सेवा धर्म उत्पन्न होत नाहीं हें प्रत्यक्ष प्रमाणावरून सिद्ध केलें जातें. पाहा कीं कोणी एक हिंदू व्यापारी आणि सरकारी कामदार हे स्वधर्माप्रमाणें मोठ्या निष्ठेने चालतात, असें कल्पूं या; व्यापारी जो आहे त्याचा नियम असा आहे कीं, प्रति एकादशीस निर्शन करायाचें, ह्मणजे त्या दिवसीं तोंडांत पळीभर पाणीहि घ्यायाचें नाहीं. तसेंच दर सोमवारीं, शुक्रवारीं, शनवारीं, रविवारीं एक व्रत करायाचें व दररोज स्नान करून देवपूजा केल्याशिवाय कांहीं खायाचें नाहीं. याप्रमाणें त्याची निष्ठा असी असती कीं, जरी दुखणें आलें तरी नियम टाळायाचा नाहीं. बरें, आतां दुसरा जो सरकारी चाकर ज्यास मोठा हुद्दा आहे, त्याचा नियम असा आहे कीं, प्रति पंधरवड्यास विनायकी चतुर्थी व संकट चतुर्थीचा उपवास करायाचा संकष्टीच्या दिवसीं रात्रौ चंद्राची पूजा केल्याशिवाय अन्नव्यवहार करायाचा नाहीं. तसेंच प्रति सोमवारीं सायंकाळीं फळहारच करायाचा आणि दररोज देव पूजा इतकी सांग करायाची कीं, जर उदबत्तीचा तुकडा नसला तर त्याक्षणींच हात खोळंबून बसायाचें व गड्याने बाजारांतून उदबत्ती आणल्याशिवाय तेथून उठायाचें नाहीं. केवढी हो ही भक्ति ! याशिवाय प्रति दिवसीं गुरूने सांगितलेल्या मंत्राचा हजार किंवा पांचशें संख्या जप

केल्याशिवाय भोजन करायाचें नाहीं. या प्रकारें जे महानैष्ठिक त्यांचीं कर्मे कसीं असतात ? कोणास वाटेल कीं हे पुरुष आपल्या सर्व कर्मांत असीच निष्ठा ठेवून ईश्वरास भिऊन चालत असतील. परंतु यांचें सर्व ढोंग देव्हाऱ्याजवळच तेथून उठले पुरे ह्मणजे मग त्यांच्या दुराचरणास व अनीतीस चारी दिशा मोकळ्या असतात.

व्यापारी आपल्या दुकानांत जाऊन बसला ह्मणजे शेकडो लोकांस ठकवितो, सहस्रावधि खोट्या शपथा घेतो पाहिजे तसीं अभद्र भाषणें बोलतो, व विश्वासघाताचीं कर्मे करितो. याचप्रमाणें तो सरकारी कामदार आपल्या कामावर गेला ह्मणजे तेथें लोकांपासून लांच खाऊन खऱ्याचें खोटें करून गैर इनसाफाचीं कामें करण्यास अगदीं भय बाळगीत नाहीं. असो, आतां याचें कारण काय ? कोणी ह्मणतील कीं, हीं त्यांची वाईट कर्मे व्रतादिकांचीं फळें नाहींत. तर त्यानी समजावें कीं हीं त्याचींच फळें आहेत. त्या व्रत करणाऱ्यांस असा अभिमान प्राप्त होतो कीं, आपण जीं कर्मे करितों, त्यांत पुण्य बहुत आहे थोडें दुराचरण केल्याने देव शासन करणार नाहीं, व ह्या गोष्टीस शास्त्रांतलीं हीं उदाहरणें आहेत. रामाचा भाऊ लक्ष्मण हा रामउपासक असतांहि त्याने आपली भाऊजयी सीता इला बंधूच्या आज्ञेवरून अरण्यांत मारायास नेऊन तिला न मारितां एक कृतीची भुज करून रामास आणून दाखविली व सांगितलें कीं मी सीतेचा वध केला.* तसेंच मारूती रामउपासक

---

* लक्ष्मणाने बंधूच्या आज्ञेवरून सीतेचा वध करण्यास नेलें हाहि त्याचा अपराध होय.

असतांहि त्यानें एका स्त्रीस फसविलें. कृष्णानें धर्म राजास लबाडी बोलायास सांगितलें. शिवलीलामृतांतहि असी कथा आहे कीं, मनांत हेतू नसतांहि शिवभजन व शिवव्रत घडलें असतां माहा पातकी तरून गेले. याप्रमाणें शास्त्रांतील दाखले असतां आह्मी यत्किंचित लबाडी पोटासाठीं केली तर तिजपासून काय होणार? असी त्यांची समजूत शास्त्राधार आहे. यामुळें त्यांस वाटतें कीं, आमचा सर्व देव धर्म ह्या व्रत उपवासांत आहे; हीं केलीं ह्मणजे सर्व सार्थक झालें.

८ परंतु अशा प्रकारच्या व्रतांपेक्षां ईश्वरानें लावून दिल्हेलीं व्रतें फार चांगलीं आहेत तींच सर्वांनी मोठ्या निष्ठेनें पाळावीं, व प्राणांत समय आला असतांहि त्यांचा भंग करूं नये. तीं व्रतें हीं आहेत. एकादशीचें व्रत सोडून सर्वकाळ सत्य भाषण करण्याचें व्रत स्वीकारावें; संकट चतुर्थीचें व्रत सोडून यथासामर्थ्य दुसऱ्याचें संकट निवारण करण्याचें व्रत आचरावें; सोमवार, शनिवार, रविवार ह्या दिवसीं एक वेळां भोजन करण्याचे नियम सोडून त्याबद्दल ईश्वरभजन करण्याचे उत्तम नियम चालवावे. मोठा देव्हारा पसरून दांभिक आचार करण्याबद्दल ज्यांत परमेश्वराचें गौरव प्रदर्शित होईल असीं कर्में करीत जावीं; आळशी व द्रव्यलोभी ब्राह्मणांस शिधे व दक्षणा देण्याचें सोडून अनाथ, रोगी, निर्बळ, यांस अन्न वस्त्र पुरवावें. याविषयीं एका ईश्वरभक्ताचें असें वाक्य आहे कीं, "देव जो बाप त्याजवळ शुद्ध व निर्मळ भक्ति हीच आहे कीं, पोरकीं व विधवा यांस त्यांच्या संकटांत भेटावें आणि आपण जगाच्या मळापासून अलिप्त राहावें." सणा-

च्या-रोजीं कर्ज काढून उधळाखर्च करण्याबद्दल आपल्या नित्याच्या गृहकृत्यांत ज्या सोईच्या व सुखाच्या वस्तू पाहिजेत, त्यांचा स्वकष्टार्जित द्रव्यानें संग्रह करावा. बहुत करून लोक आपणास कांहीं हानि झाली असतां सणाचे उत्साह करायाचे सोडितात तर त्यांनी ते अगदीच सोडून देऊन आपलें वाईट झालें असतांहि परमेश्वराची भक्ति करण्याची विशेष आवड होई, असें व्रत धरावें. असीं व्रतें आचरलीं असतां लोक सदाचरणी होतील, त्यांचे सद्गुण वाढतील, व देशाचें कल्याण होईल.

आतां तुह्मासीं व एतद्देशीय सर्व हिंदु लोकांसीं थोडेसें भाषण करून हें पत्र समाप्त करितों.

तुमच्या कल्याण्याची इच्छा धरून मी या ग्रंथांतील विषयाचें यथामति निरूपण केलें. आतां ह्यापासून तुह्मीं कोणता बोध घ्यावा हें देखील सांगणें नलगे. प्रत्येक पत्रांतील सणावर जो विचार लिहिला आहे, तो बोधरूपच आहे. त्यापासून तुह्मास आपल्या सणांचें वास्तविक स्वरूप दृष्टीस पडेल असी माझी आशा आहे. त्यांत जर कांहीं विषम व तुमचें मन दुखविण्याजोगें असलें, तर त्याविषयीं मला क्षमा करावी. हा ग्रंथ रचण्यांत माझा हेतू ह्मणाल तर केवळ तुमची सुधारणा व्हावी, इतकाच आहे. द्वेषभावानें कोणाची निंदा किंवा छळणूक करण्याचें म्या मनांतहि आणिलें नाहीं. अपशब्द, दुर्भाषणें, वृथानिंदा, सदोष विनोद, कुकल्पना, यांपासून माझ्यानें जितकें दूर राहवेल तितकें राहून अज्ञान व दुष्ट चालींचा नाश होण्याचे उपाय दाखवून सत्यता स्थापण्याचा प्रयत्न केला आहे. हा ग्रंथ साद्यंत वाचून त्या-

विषयीं तुह्मी निःपक्षपाताने व दुराग्रह सोडून शांतपणें विचार करा. ह्मणजे तुह्मामध्यें जे बहुत सण आजपर्यंत चालत आले आहेत, त्यांपासून लाभ किंवा हानि होती हें समजेल. माझ्या मतें तर त्यांपासून प्रत्येक मनुष्यास व सर्व देशाश हानि होती. प्रत्येक पुरुषाची हानि कसी ह्मणाल तर ऐकाः—जो पुरुष सण पाळतो व व्रतें उपवास करितो त्याचें अमूल्य आयुष्य व्यर्थ जातें. त्याची शरीर-संपति+ व धनसंपत्ति यांचा नाश होतो. त्याचें मन ईश्वरपरायण होत नाहीं. त्याचीं मुलें विद्येकडे दुर्लक्ष्य करितात, व त्यांस सणापासून कांहींच निति व सद्गुण प्राप्त होत नाहींत. याच्या उदाहरणार्थ **गणेश चतुर्थी, दिपवाळी, होळी**, ह्या सणांवरील विचारांचें मनन करावें ह्मणजे समजेल. सणामुळें ऋणाग्नि घरांत शिरतो आणि ऋणाच्या पोटीं किती दुर्गुण व दुर्व्यसनें असतात! कर्जबाजारी लोक आपल्या सावकारास किती वायदे सांगतात? तेणेंकरून त्यांच्या प्रमाणिकपणास बट्टा लागतो, त्यांस अमान्यत्व प्राप्त होतें आणि सर्वदा चिंता लागल्ये निरर्थक ऋण हें विपत्तीचें व कुकर्माचें बीजच आहे. त्यावर ह्या सणांचा वर्षाव झाला ह्मणजे त्यास अंकूर फुटतो, व पुढें त्याचा उत्तरोत्तर वृक्ष वाढूं लागतो. तर हा अनर्थ चुकावयास सण कमी केल्यावांचून दुसरा उपाय नाहीं. सणाची वृष्टि न झाली ह्मणजे ऋणवृक्ष सहजच सुकून जाईल. मग त्यापासून अनिष्टकारक कुफळें कोठून उत्पन्न होतील? याप्रमाणें सणापासून प्रत्येक मनुष्याचें व त्याच्या कुटुंबाचें

---

+ शरीरसंपत्ति अशक्त असली ह्मणजे मनाची शक्तिहि कमी होती, व अशक्त मनुष्याची संततीहि निर्बळ व रोगी निपजती.

अनर्थित होतें तेणेकरून सर्व देशाचीहि हानि होती. तुमचे सण बहुत असल्यामुळें तुह्मास स्वदेश सुधारण्याचे उपाय सुचत नाहींत. अगोदरच तुमचे मन सर्वदा उदरनिर्वाहाच्या कामांत गुंतलें असतें, आणि तशांत तुह्मास जो विश्रांतीचा वेळ मिळतो, तो अशा प्रकारचे सण पाळण्यांत जातो. एक सण गेला नाहीं तंव त्याच्या पाठीवर दुसरा तयार असतो, अशामुळें तुह्मास मोकळीक मिळत नाहीं. मग तुह्मास आपल्या शरीराच्या वासना तृप्त करण्याचे उद्योगापेक्षां उत्कृष्ट असा जो ज्ञान वृद्धीचा व्यापार व विद्योपसंग तो करण्यास कोठून सुचेल? परंतु ज्या देशांत सण फारच कमी व ज्यांच्या सणांचीं लक्षणें या ग्रंथांत लिहिलेल्या सणांप्रमाणें नाहींत, तेथील लोकांची अवस्था तुमच्या स्थितीसीं ताडून पाहा. तेथील शेतकरी, व्यापारी, कसबी, विद्वान, शास्त्री, पंडित, धर्मोपाध्ये, इत्यादि सर्व प्रतीच्या मनुष्यांत आपापलीं कसबें कला कौशल्यें, व ज्ञान यांची वृद्धि होण्यास निरनिराळ्या मंडळ्या व सभा स्थापित झाल्या आहेत. तेथें ते लोक नियमाप्रमाणें महिन्यांतून अमुक वेळां एकत्र जमून नवीन शोध, नवीन विषय, यांचा विचार चालवितात व त्यावर व्याख्यान करितात. जो तो आपापल्या फुरसतीच्या वेळाप्रमाणें तेथें जाऊन आपलें ज्ञान वृद्धिंगत करून घेतो; तेथें जे सभासद असतात, ते आपल्या स्वदेशकल्याणाचा विचार करितात, लोकांचीं दुःखें कशीं कमी होतील त्यांस विद्या, प्रतिष्ठा कशी मिळेल व्यापार कसा वाढेल, गांवांत चोर, लबाड, दारूबाज इत्यादि दुर्व्यसनी लोकांस ज्ञानोपदेश कसा मिळेल इत्यादि विषयावर संभाषण करून,

उपाय योजीत असतात. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स व दुसरे युरोप खंडांतील देश आणि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें हीं ज्या कारणानीं इतक्या महत्वास चढलीं, त्यांतून त्या लोकांचा काळाचा साह्य करण्याचा उत्तम नियम हें एक कारण होय. वर सांगितल्याप्रमाणें मंडळ्या व सभा असल्यामुळेंच तेथें मोठमोठीं लोकोपयोगी कृत्यें झालीं आहेत. छापखाने, वर्तमान पत्रें, लक्षावधि प्रकारचीं पुस्तकें, दुर्बिन यंत्र, होकायंत्र, नानाप्रकारचीं घड्याळें, आगबोटी, लोखंडी रस्ते, विमानयंत्र, विद्युलतेच्या योगानें हजारो कोशांवरील वर्तमान क्षणांत आणण्याचें इलेक्‌त्रिक टेलेग्राफ नामक यंत्र, देवी काढण्याची युक्ति, कापुस कातण्याचें यंत्र इत्यादि अनेक प्रकारचीं उपयुक्त व लोककल्याणकारण कलाकौशल्यें व विद्या उत्पन्न होण्याचीं कारणें पाहूं गेलें असतां त्या लोकांत हिंदूच्या सणासारिखे सणवार नसणें हें दुसऱ्या कित्येक मुख्य कारणांतील एक होय. तर आपल्या देशाची अशी स्थिति करण्यास हीं जीं अनेक साधनें अवश्य आहेत, त्यांत हें कां नसावें?

आतां कोणी जुन्या समजुतीचे वृद्ध असें ह्मणतील कीं, आमचे दस गेले व पांच राहिले. आह्मास हा विचार कशास पाहिजे? तर अशांस हा ग्रंथ मी सादर केला नाहीं. जे तरूण विद्वान व त्यांच्या मताचे वृद्ध गृहस्थ आपल्या देशाचें वास्तविक मनापासून कल्याण इच्छितात, त्यांपासून या ग्रंथाचें मी फळ पाहण्याची आशा धरिली आहे. यास्तव त्यांस माझी शेवटची प्रार्थना हीच आहे कीं, या ग्रंथीं ज्या गोष्टींचा निषेध केला

आहे त्यापासून तुह्मी दूर राहा, व नीति, सुभक्ति, विश्वास, प्रीति, सहनता, लीनता यांच्या मार्गे चाला; ह्मणजे सर्व सुखाचें माहेर असा जो परमेश्वर तो तुमचें कल्याण करील.

---

## ग्रंथशेष.

### चैत्र मास—वर्ष प्रतिपदा.

ह्या दिवसीं हिंदु लोकांचे शालिवाहन शकाचें नवें वर्ष चालू होतें, ह्मणून त्यास वर्षप्रतिपदा असें ह्मणतात. आणि त्याच दिवसीं अयोध्येचा राजा श्रीरामचंद्र हा रावणाचा पराजय करून विजयी होऊन लंकेहून स्वनगरीस परत आला. त्याच्या जयोत्साहार्थ त्या कालच्या लोकांनीं महदानंदाने आपापल्या द्वारासीं यशाचे ध्वज उभारिले. त्याप्रमाणें आतांचे हिंदुलोक करितात. वर्ष प्रतीपदेच्या दिवसीं काय काय करावें ह्याविषयीं संकृत पंचागांत सांगितलें आहे, त्याचें भाषांतर येणेप्रमाणें ;

“वर्ष प्रतिपदेच्या दिवसीं मोठ्या सकाळीं उठून मित्र, भाऊबंद, आश्रित, वैदिक, शास्त्री पंडित इत्यादिकांस बोलावून त्यांस अभ्यंग करून स्नानें घालावीं; नंतर आपणहि स्त्रीसहित तसेंच स्नान करून उंचीं उंचीं वस्त्रें नेसून दागीने घालून केंशरीगंध, अक्षत व फुलें इत्यादि शरीराला शोभविणारे अलंकार धारण करावे आणि कडूनिंबाचा पाला खावा व आपल्या कुलदेवतेची पूजा करून उत्तम जोतिष्याच्या मुखेंकरून शक, त्या वर्षाचा राजा, मंत्री, धान्यस्वामी, रसस्वामी, इत्यादि वर्षफळ आदराने ऐकावें. आणि पंचांगावर जी गणपतीची मूर्त्ती काढलेली असेल तिची पूजा करावी, पंचांग

वाचणाऱ्या जोतीष्याचेंहि पूजन करावें आणि पुष्कळ धर्म करून सर्व गोरगारिबांस आनंद करावा. आणि तऱ्हे-तऱ्हेचीं वाद्यें व गायनें श्रवण करावीं नाना प्रकारच्या सुंदर गोष्टी ऐकाव्या. याप्रमाणें तो वर्षाच्या प्रारंभाचा दिवस घालवावा, ह्मणजे त्या मनुष्यास वर्षभर तसेंच सुख प्राप्त होईल."* अणखी असें सांगतात कीं, त्या दि-वसीं ब्रह्मदेवाचें आयुष्य ऐकावें ह्मणजे आपल्यास दीर्घा-युष्य प्राप्त होतें.

---

## सण २.

### रामनवमी.

ह्याच महिन्यांत दुसरा प्रसिद्ध सण रामनवमी, जिला संस्कृतामध्यें रामजयंती ह्मणतात, तो येतो. ह्या सणाची उत्पत्ती येणेप्रमाणें आहे. त्रेतायुगाच्या ठायीं सूर्य वंशीचा मुगुटमणी राजा इक्ष्वाकू होता. त्यापासून हरिश्चंद्र राजा झाला. त्यामागून साहावा दिलीप राजा राज्य करिता झाला. त्याचा पुत्र रघू; त्याचा पौत्र दशरथ राजा महा-प्रतापवान हा भरत खंडाच्या उत्तर प्रदेशीं गोमती नदी-च्या तिरीं अयोध्यानगरीच्या ठायीं राज्य करीत असतां त्याची पत्नी कौसल्या ही प्रथम पुत्रातें प्रसवली. त्याचें नामाभिधान राम असें ठेविलें. त्याचा जन्मकाळ राम-विजय नामक प्राकृत ग्रंथीं लिहिला आहे. तो येणेप्रमाणें ;

वसंतऋतू चैत्रमास ॥ शुद्धपक्ष नवमी दिवस ॥ माध्या-
न्हकाळ पुष्यनक्षत्र ॥ तेंदिवसीं रघुनंदन जन्मला ॥१॥

---

*सर्वसंग्रही पंचांग. सन १८४७ चें पाहावें.

हा मूल पुढें मोठा पराक्रमी योद्धा झाला. त्याचा जन्मदिवस हिंदुलोक मोठ्या उत्साहाने पाळितात. त्या दिवशीं हिंदुलोक प्रातःकाळीं स्नानादिकर्मे करून सुमारें अक्रा वाजतां रामाच्या देवळांत जातात. तेथें हरदास बावाचें कीर्तन चाललें असतें त्यांत रामजन्माची कथा लावितात, पुढें सूर्य मध्यान्हीं येण्याचा काळ समिप आला ह्मणजे एकाद्या उंची प्रावरणांत नारळ गुंडाळून पाळण्यांत ठेवितात, व जर हरदास बावा नकली असले, तर सुयर्णाचे हावभाव दाखवून त्या बाळाचें लालन करून दाखवितात; नंतर रामाचा पाळणा गाऊन तें बाळ कीर्तनमंडळींतील लोकांजवळ देतात. ते त्यास नमन करून त्याजवर पुष्प अक्षता इत्यादि टाकितात कित्येक त्याचें प्रेमभरित चुंबन घेतात नंतर जयजयकार शब्द करून सर्वजण आपापल्या घरीं जातात. हा सणाचा दिवस पाळणारे आपापल्या सामर्थ्याप्रमाणें मेवामिठार्या, केळीं, आंबे इत्यादि किंवा गव्हाचीं कांहीं पक्वान्नें करून खातात. भात जेवीत नाहींत. रामनवमी झाल्यावर पांचव्या दिवशीं देवळांत ललीत करून रामजन्मोत्साह संपूर्ण करितात. हरदास लोकांचें दरठिकाणीं ह्या सणाबद्दल वर्षासन असतें, तेथें त्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याने कथा करवत नाहीं.

## सण ३.

### वैशाख मास—अक्षतृतीया.

हा सण वैशाख मासीं शुद्ध पक्षीं तृतीयेच्या दिवशीं येतो. त्याची उत्पत्ती पुराणांत असी कथिली आहे

कीं, त्रेतायुगाच्या ठायीं सूर्य वंशांतील भगीरथ राजाने ह्या दिवशीं ब्रह्मलोकाहून भागिरथी आणिली.

परंतु अणखी एक असी कथा आहे कीं, विष्णूच्या चरणांगुष्ठापासून गंगानदी हिमालय पर्वतीं वाहत आली! तेथें तिला शिवाने आपल्या मस्तकीं धारण केली. नंतर भगीरथ राज्याने तिचें सरितापतीशीं लग्न लावून दिल्हें.

हा सण उष्ण काळीं येतो ह्मणून त्या दिवशीं ब्राह्मणास जलपूरित कुंभदान केलें असतां महापुण्य प्राप्त होतें, असें विष्णु पुराणांत सांगितलें आहे. ह्मणून हिंदुलोक मोठ्या भक्तीने त्या दिवशीं ब्राह्मणास बोलावून त्यांची पुजा करितात, व त्यास आपल्या सामर्थ्यानुरूप तांब्याचा किंवा मृत्तिकेचा कलश उदकाने भरून देतात. आणि आपल्या पितरांस स्वर्गपथ चालतांना उष्णाची बाधा होऊं नये, शीतल वायू लागावा व पायांस कांटे रुतूं नयेत ह्मणून ब्राह्मणास छत्री, पंखा, जोडा, काठी इत्यादि दान देतात.

कोणी कोणी चैत्र वैशाख या दोन्हीं महिन्यांत प्रतिदिवशीं ब्राह्मणास कुंभदान करितात व सायंकाळीं आपल्या घरीं त्यांस बोलावून त्यांच्या अंगास चंदनाची उटी लावून गळ्यांत सुवासिक पुष्पाच्या माळा घालितात, कित्येक त्यांजकडून वेदांतील कांहीं मंत्र स्तोत्रें वगैरे ह्मणवून त्यास फळाहार घालितात. याला वसंतपूजा असें ह्मणतात.

अक्षतृतीयेचा दिवस साडेतीन मुहुर्तांतील अर्धा मुहुर्त फार उत्तम असें हिंदुजोशी सांगतात. त्या कारणावरून कारागीर

लोक कृषिकर्म संबंधीं हत्यारें आजच्या दिवसीं मुहूर्ताने करायास आरंभितात, व शेतकरी लोक रबीची पेरणी करण्याकरितां शेतांतून नांगर फिरवितात, व बायका मुलें जी चातुर्मासासाठीं आपल्या परड्यांत भाजीपाला लावितात, ती आजच्या दिवसीं मुहूर्ताने जमीन बेणून, त्यांत बीज पेरितात; व त्या वेळीं अमक्याचें हातचें बीं चांगलें उगवतें व अमक्याचा हात वाईट आहे अशा पुष्कळ भवति न भवति निघत असतात.

ह्या दिवसीं कोणी एक भुक्त* उपवास करितात. परंतु बहुतकरून सर्वजण सणाचें किंवा साधें जेवण जेवितात. खरीपाच्या पिकाचें नवें धान्य ह्मणजे गहूं, शाळू वगैरे ह्या सणापासून खाण्याची देशावर कोठें कोठें चाल आहे.

---

## सण ४.

### ज्येष्ट मास—वटसावित्री व्रत.

हें व्रत स्त्रियांचें आहे. ज्येष्टमासांतील पौर्णिमेस वटपौर्णिमा असें ह्मणतात. या व्रताच्या उत्पत्तीविषयीं पांडवप्रताप ग्रंथांत वनपर्वा अध्यायीं लोमेशऋषीने धर्मराजास कथा सांगितली आहे. ती येणेप्रमाणें:—

पूर्वीं महेंद्रदेशीं अश्वपती नामक राजा होता, त्यास पुत्रसंतान नव्हतें ह्मणून त्याने सावित्रीची आराधना मांडिली. तेव्हां १८ वर्षें तप केल्यावर त्यास देवी प्रसन्न होऊन ह्मणाली, कीं तुझ्या दैवीं पुत्र नाहीं. परंतु तुला एक सुंदर कन्या होईल. त्याप्रमाणें कन्या झाल्यावर

---

*(पितृतिथीं असें मानून.)

तिचें नाव राजानें सावित्री असें ठेविलें. पुढें ती उपवर झाल्यावर आपणास भ्रतार पाहण्याकरितां देशोदेशीं फिरून द्युमत्सेन राजाच्या सत्यवान नामक पुत्रास मनींनियमित करून परत बापापासीं आली, व सर्व वर्तमान सांगत आहे इतक्यांत तेथें नारदानें असी बातमी आणिली कीं, द्युमत्सेनाचे नेत्र जाऊन दायादानें त्याचें राज्य हिरावून घेतलें व तो आतां दरिद्रानें व दुःखानें पीडित होत्साता पुत्रदारा सहवर्तमान वनवास करीत आहे. तर अशासीं संबंध करून काय उपयोग ? हें ऐकून सावित्रीचा निश्चय ढळला नाहीं. तेव्हां पुनः नारदानें सांगितलें कीं, सत्यवानाची आयुष्यमर्यादा अणखी एक संवत्सरपर्यंत आहे. परंतु त्या सतीचा वज्र संकल्प ढळला नाहीं. शेवटीं तिनें सत्यवानासीं लग्न लाविलें. पुढें ती आपल्या पतीबराबर अरण्यांत कंदमुळें व फळें आणायास जात असे. एका दिवसीं सत्यवान नित्याप्रमाणें (याच पोर्णिमेस) स्त्रीसहित अरण्यांत जाऊन वटवृक्षाचीं शुष्क काष्टें मोडीत असतां एक काष्ट त्याच्या गंडस्थळीं अदळून तो गतप्राण होत्सातां भूमीवर पडला. नंतर यमधर्म त्याचा लिंगदेह काढून नेत असतां सावित्री त्याच्या पाठीस लागली व त्याची प्रार्थना करून आपल्या पूर्व पुण्याचें बळ दाखवून त्याकरवीं पतीचें पुनरुत्थान कराविलें. त्यावेळीं स्वर्गीहून सर्व पतिव्रता स्त्रियानी येऊन सावित्रीचें व सत्यवानाचें वटवृक्षासहित पूजन केलें. तेव्हां पासून सर्व स्त्रिया सावित्रीव्रत करूं लागल्या, ज्या कोणी गर्वानें हें व्रत चालवीत नाहींत, त्या जन्मोजन्मीं विधवा होतील, आणि ज्या चालवितात, त्यांस अखंड सौभाग्य प्राप्त होईल. जे पुरुष हें चरित्र ऐकतात, ते दीर्घायुषी होतील

त्यांस ऐश्वर्य कल्याण प्राप्त होईल. आणि त्याच्या महारोगाचें दहन होऊन गंडांतर मृत्यु निरसेल.

याप्रमाणें सावित्री व्रताची उत्पत्ति व त्याचें महात्म ब्राह्मण लोक सांगतात; ह्मणून हिंदूच्या स्त्रिया तें मोठ्या भावाने करितात. हा सण आला ह्मणजे जेथें वडाचीं झाडें असतात, तेथें बायकांचा मोठा मेळा दृष्टीस पडत असतो कोणीकोणी भटाकरवीं घरींच वडाची डाहाळी आणवून पूजा करितात.

---

## सण ७.

### आषाढ मास—महा एकादशी.

हिंदु लोकांमध्यें हा मोठा उपवासाचा दिवस आहे. जे कोणी सर्व वर्षांत एकहि एकादशी करीत नाहींत ते सुद्धां आजच्या दिवशीं उपवास करितात, नित्याप्रमाणें जेवीत नाहींत, दूध, मेवा, फळें, इत्यादि पदार्थ खातात. आणि ही एकादशी केल्यानें सर्व एकादशी केल्याचें फळ येतें. पंढरीस आजच्या दिवशीं विठोबाच्या देवळांत मोठी यात्रा भरती. दक्षण माहाराष्ट्र देशांतून गावोंगांवचे लोक तेथें आल्यामुळें तुळसीमाला, अबीर बुका, खारीक, केळीं, लाह्या, याचा खप फार होतो. विठोबाच्या भेटीस लोकांची दाटी इतकी होती कीं, ती कमती करण्याकरितां तेथील पुजारी विठोबाच्या भक्तांस धोतरांचे तोबे करून मारीत असतात.

ह्या दिवशीं पुराण व कीर्तन श्रवणार्थ भाविक लोक आपापल्या गांवांतील देवळींत जमत असतात.

## सण ६.

### श्रावण मास—नागपंचमी.

श्रावणशुद्ध पंचमीच्या दिवशीं सर्पांचा राजा जो नाग, त्याचा जन्म झाला ह्मणून ह्या सणास नागपंचमी असे ह्मणतात. जशी रामनवमी गोकुळ अष्टमी, इत्यादि जन्मोत्साहाचे सण आहेत तसाच हा एक ह्मटल्यास चिंता नाहीं. ह्या दिवशीं नागाची पूजा करण्यास हिंदु लोक त्याच्या वारुळाजवळ जमत असतात. तेथें त्यास दूध, साखर, केळीं, लाह्या इत्यादि अर्पण करितात; व गंध अक्षता फुलें येणेकरून त्याची पूजा करितात. नाग पूजेचे कांहीं प्रकार आहेत, कोणी मातीचा नाग घरींच करितात; कोणी केळीच्या पानावर गंधाचा नाग काढितात; कोणी देवळांत दगडाचा नाग असतो, तेथें जाऊन त्याची पूजा करितात. पहिल्या दोन प्रकारांत नागोबाची मृत्तिकाकृती अथवा चित्र, पूजा विसर्जन झाल्यावर परसांत आळवाच्या झाडांत नेऊन ठेवितात.

नागपंचमीस नाग पूजिला असतां वर्षभर सर्पाची बाधा होत नाहीं. ज्या कोणास सर्पाचा मंत्र येतो, त्याने ह्या दिवशीं जें कांहीं पदार्थ खायास मिळतील, तेच वर्षभर खावें, असें आहे ह्मणून ह्या ऋतूंत जीं फळें वगैरे मिळत नाहींत, त्या झाडाचा पाला तरी ते खाऊन आपली मोकळीक करून ठेवितात.

---

## सण ७.

### नारळी पौर्णिमा.

श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं दोन तीन सण अस-

तात. ह्मणजे नवें जानवें घालून वार्षिक प्रायश्चित्त घेणें हा एक; हातास रक्षा बांधणें हा दुसरा; व नारळी पौर्णिमा ह्मणजे समुद्रास नारळ अर्पण करून त्याची शांति करणें हा तिसरा.

पहिल्या कर्मविधीचें कारण असें आहे कीं, आपल्या देहांतील त्वचा, अस्थि यांत जें पाप आहे, तें पंचगव्य प्राशन करून घालवावें, व दीर्घायुष्यदायक असें जें यज्ञोपवीत तें धारण करावें. ह्या कर्मास होम वगैरे करीत असतात. याला श्रावणी असें ह्मणतात.

ह्या पौर्णिमेस राखीपौर्णिमा ह्मणतात. कारण कीं त्या दिवशीं भट आपल्या यजमानाच्या व त्यांच्या घरांतील सर्व माणसांच्या हातास एक दोरा बांधितो, त्यास रक्षा असें ह्मणतात. तेणेकरून सर्व संकटापासून रक्षण होतें, असें ते समजतात. गुजराथी व रजपूत लोकांत ह्या सणाची मोठी प्रसिद्धि आहे.

तिसरा सण नारळी पौर्णिमेचा आहे. जे लोक समुद्रकांठीं व्यापाराच्या बंदरांत राहतात, ते मात्र हा सण पाळतात. वरकड ठिकाणीं याची प्रसिद्धि नाहीं. सर्व ठिकाणांपेक्षां मुंबईंत, याचा विशेष महिमा आहे. या दिवशीं समुद्रतिरीं लोकांचा मोठा समुदाय मिळतो; तेथें ते प्रथम समुद्राची पूजा करून त्याने शांत होऊन तुफान वगैरे करूं नये व जाहजें सुरळीतपणें चालूं द्यावीं ह्मणून त्याची प्रार्थना करून, त्यास नारळ अर्पण करितात.

———

## सण ८.

### जन्माष्टमी.

विष्णूचा आठवा अवतार जो कृष्ण त्याचा जन्म मथुरेंत या दिवशीं झाला ह्मणून या सणास जन्माष्टमी असें ह्मणतात, व दुसरे दिवशीं तो गोकुळांत गेला, त्यावरून त्या दिवसास गोकुळअष्टमी असें ह्मणतात. त्या कृष्ण जन्माविषयीं हरिविजयग्रंथीं येणेप्रमाणें लिहिलें आहे ;—

> वर्षाऋतू श्रावणमास ॥ बुधाष्टमी कृष्णपक्ष ॥ अवतरला कमळदळाक्ष ॥ रोहिणी नक्षत्र ते दिवशीं ॥ १
> सोमवंशीं अवतार ॥ ह्मणोनी साधिला चंद्रपुत्रवार ॥ झाला शशीचा उद्धार ॥ दशा आली वंशासी ॥ २ मध्यरात्री अष्टमीस ॥ देवकीपुढें परमपुरुष ॥ चतुर्भुज ऋषीकेश ॥ निमासुर डोळस पै ॥ ३.

याप्रमाणें कृष्णजन्म मध्य रात्रीस झाला ह्मणून त्या संबंधी उत्साह रात्रीस करितात, व गोकुळ अष्टमीचा उत्साह दुसरे दिवशीं दोन प्रहरीं होतो. पहिल्या उत्साहाचा प्रकार असा आहे कीं, मध्यरात्रीं कृष्णजन्म आख्यान वाचून बाळकृष्णाच्या मूर्तीची पूजा करितात. आणि कानोबाच्या मठांत वारीं येऊन चार घटिका खेळून जातात, दुसऱ्या दिवशीं दहिकाला होतो; तेथें दह्याची हांडी एका खांबास टांगिलेली असती ती फोडून भूमीवर पडलेलें दहीं आंगास चोळितात, व कोणी, तें प्रसादवत मानून मोठ्या आवडीने चाटतात. गोकुळ अष्टमीचा उत्साह बैरागी लोकांत फार होत असतो; गोकुल, मथुरा, वृंदावन, द्वारका, पंढरपूर इत्यादि ठिका-

र्णीं ह्या दिवसीं मोठा गजर होतो; ह्या सणाचा उपास कोणी पहिल्या दिवसीं व कोणी दुसऱ्या दिवसीं करितात.

---

## सण ९.

### भाद्रपद मास—गणेशचतुर्थी.

ह्या सणाची उत्पत्ति संस्कृत ग्रंथांत कशी असेल, ती असो; परंतु प्राकृत हरिविजय ग्रंथांतील ह्या पुढील ओव्यावरून जो अर्थ समजतो, तो याच्या उत्पत्तीस लागू आहे यांत संशय नाहीं.

श्री कृष्ण ह्मणे कैलासीं ॥ प्रदोषकाळीं शिवदर्शनाशीं ॥ आपुलाल्या वहनी बैसोनीं वेगेसीं ॥ सुराचे भार चालिले ॥१॥ इंद्र चंद्र वरूण कुबेर ॥ अष्टवसू गंधर्व किंन्नर ॥ मूषकारूढ शिवपुत्र ॥ गजवदनही चालिला ॥२॥ शिवगिरी चढतां झाली दाटणी ॥ गणेश पडिला मूषकावरूनी ॥ मागुती बैसला सावरोनी ॥ तो चंद्र गगनीं हांसला ॥३॥ तें जाणोनी गजवदन ॥ शाप दिधला दारूण ॥ जो तुझें करील मुखावलोकन ॥ त्यावरि येती अपराळ ॥४॥ ऐसें चंद्रें ऐकिलें ॥ मुख आपुलें आछादिलें ॥ मग सकळ देवीं प्रार्थिलें॥ गजवदनासीं ते वेळीं ॥५॥ केलें देवीं बहुत स्तवन॥ तेणे गणेश झाला सुप्रसन्न ॥ देव ह्मणती चंद्राचें शापविमोचन ॥ करावें जी कृपाळुवा ॥६॥ मग चंद्रा आणूनी ते आवसरी ॥ घातला गणपतीच्या पायावरी ॥ ह्मणे माझे वरद चतुर्थीसीं निर्धारीं॥ वदन ह्याचें न पाहावें ॥७॥ वरकड दिवस अवघे मुक्त ॥ परि वरद चतुर्थीसीं न पाहावा सत्य ॥ सत्राजितासीं ह्मणे कृष्णनाथ ॥ पूर्व वृत्तांत ऐसा असे॥८॥

याप्रमाणें गणेश चतुर्थीचे दिवसीं चंद्रमुखावलोकन

न करण्याचें कारण आहे. परंतु कृष्णानें ही गोष्ट ज्या वेळीं सांगितली, किंवा ग्रंथकारानें आपल्या ग्रंथीं त्याच्या तोंडांतून वदविली त्यावेळीं गणपतीची पूजा आतां जशी होती, त्याचप्रकारची चालत होती किंवा कसें, याचा निश्चय होत नाहीं. सांप्रतचा प्रकार येणेंप्रमाणें आहे:—

गणेश चतुर्थी आली ह्मणजे गणपतीची मृण्मय मूर्त्ति करून तिची पूजा करितात. कोणी कोणी चालीप्रमाणें घरींच गणपती बनावितात. कोणी बाजारांतील विकत आणितात. गणपती घरीं ठेवण्याचा काळ शास्त्रांत दीड दिवस सांगितला आहे. परंतु रूढीप्रमाणें कोणी पांच, सात, दाहा अक्रा व एकवीस इतके दिवसपर्यंत ठेवितात. कोणी एका वर्षाचा गणपती दुसऱ्या वर्षापर्यंत ठेवून नवा आल्यावर जुन्याची पाठवणी करितात. प्रत्येक गणपती-जवळ त्याचें वाहन (मूषक) असून त्याचीहि पूजा करावी लागती.*

या सणाचा कोणी उपवास करीत नाहीं; परंतु पंच-पक्वान्नें करून जेवितात. गणपतीसमोर कीर्तन व वेश्याची बैठकहि करितात.

---

## सण १०.

### आश्वीन मास—विजया दशमी.

हा सण आश्वीन शुद्ध दशमीचे दिवशीं येतो. या दि-वशीं शक्तीनें महिषासुराचा वध करून जय मिळविला,

---

* गणपतीस पक्वान्नांपैकीं मोदक फार आवडतात व ते २१ असले पाहिजेत आणि दूर्वा ह्मणून एक जातीचें गवत आहे तें त्याला आंगावर घेण्यास फार आवडतें.

ह्मणून यास विजया दशमी असें ह्मणतात. दसऱ्याच्या पूर्वी ह्मणजे नऊ दिवसपर्यंत घटस्थापना केली असती, त्यास देवीनवरात्र असें ह्मणतात. ह्या नऊ रात्री देवीने निद्राकरून दाहाव्या दिवशीं वर सांगितल्या दैत्यास मारिलें ह्मणून देवीभक्त नऊ दिवस उपवास करितात. ते आपल्या घरीं एका उदककुंभावर देवीच्या मूर्त्तीची स्थापना करून तिजपुढें भूमीवर पंच धान्यें पेरून एक अखंडदीप जाळत ठेवितात. नऊ दिवसपर्यंत दररोज फुलाची एक एक माळ देवीवर टांगतात, कोणाचे घरीं चढत्या माळा असतात. कित्येक ठिकाणीं गांवांतील प्रसिद्ध दैवतांची ह्मणजे मारुती, विठोबा, त्र्यंबकोबा वगैरे यांची पालखी निघत असती. तिजपुढें कलावंतिणीचा नाच होत असतो. हा प्रकार नऊ दिवसपर्यंत होऊन नंतर दसऱ्याच्या दिवशीं सर्व लोक आपापल्या ग्रामदैवतांसहवर्तमान सीमा उल्लंघन करायास गांवाच्या बाहेर जातात. तेथें ब्राह्मण आपापल्या यजमानास शमीच्या झाडाजवळ किंवा तें नसल्यास त्याची डाहाळी रोऊन तिजजवळ नेऊन शमीपूजन करितात. नंतर ते सर्व जण शमीचीं पानें लुटतात; व तीं परस्परांस देऊन प्रीतीचें आलिंगन करितात. शमीच्या पानांबद्दल बहुतकरून सर्व लोक आपट्याचीं पानें वाटतात; या दिवशीं त्या पानांस सोन्याची संज्ञा प्राप्त होती.

दसऱ्याच्या दिवशीं सर्व हिंदुलोक आपापल्या पोटभरण्याच्या साधनाची (हत्येराची) पुजा करितात. या शिवाय या दिवशीं ज्याच्या घरीं घोडे असतात, ते त्यांस शृंगारून त्यांची पूजा करितात. या पूजेस खांडे पूजा असें ह्मणतात. दसऱ्याच्या दिवशीं कोठें कोठें देवीस

रेडे अर्पण करितात. परंतु बकऱ्याची बळ तर जिकडें तिकडे पडती. दसऱ्याच्या पूर्वीं तीन दिवस सरस्वती (पोथ्या पुस्तकाचें) पुजन होत असतें. आणि ते तीन दिवस पढणें बंद असतें. दसरा हा साडेतीन मुहूर्तांतील एक मानिला आहे. ह्या दिवशीं मुलास विद्याभ्यास करण्याचा व कोणतेंहि नवे कामाचा आरंभ करितात. ह्या दिवशीं कोणी उपास करीत नाहीं.

---

## सण ११.

### दिवाळी.

या सणांचा प्रारंभ आश्विन वद्य त्रयोदशीपासून होतो, याजबरोबर अणखी दुसरे दोन तीन सण असतात ते सर्व मिळून दिवाळीचे पांच दिवस मानले आहेत. त्यांत प्रति दिवशीं अनुक्रमाने जीं कृत्यें करितात, तीं येणेप्रमाणें.

पहिल्या दिवसास धनत्रयोदशी ह्मणतात. त्या दिवशीं प्रातःकाळीं गाईची पूजा करितात, व संध्याकाळीं धनाची पूजा करून, दक्षिणेस तोंड करून यमप्रीत्यर्थ दिवा लावितात. मग दिवाळींत जी कांहीं आराष करायाची तिला प्रारंभ होतो. आणि येत्या पाहाटेस स्नानाकरितां पाणी भरून ठेवितात. स्नानाच्या वेळेस फटाके वगैरे दारूचा पुष्कळ खप होतो.

दुसऱ्या दिवसास नर्कचतुर्दशी असें ह्मणतात. या दिवशीं कृष्णाने नरकासुर नामें दैत्य मारून सोळा हजार स्त्रियांस त्याच्या बंदांतून सोडून त्यांशीं आपलें लग्न ला-

विलें, याविषयीं हरिविजय नामें ग्रंथीं येणेप्रमाणें लिहिलें आहे.

> आश्वीन मास कृष्ण चतुर्दशी ॥ तीन प्रहर सरलियानिशी ॥ चंद्रोदयीं नरकासुरासी ॥ मुक्ती दिधली श्रीवरें ॥१॥ हरिनें नरकास दिधला वर ॥ येसमयीं मंगळ स्नान न करी जो नर ॥ तो परम दरिद्री दुराचार ॥ जन्मवरी जाणिजे ॥२॥

या शास्त्रार्थावरून हिंदू लोक नर्कचतुर्दशीच्या दिवसीं उदयीक अरूणोदयापूर्वीं अंगास सुगंध द्रव्य लावून स्नान करितात. यावेळींहि दारूचा भडका उडतो.

दिवाळींचे तिसरे दिवसीं आमावास्या येती. यासच दिवाळी ह्मणतात. या दिवसीं जे श्रीमंत आहेत ते आपल्या घरीं नाण्याची पुजा करितात. आणि व्यापारी व सावकार लोक आपापल्या जमाखर्चाच्या वह्यांची पुजा करितात. ह्यास लक्ष्मीपुजन असें ह्मणतात.

चवथ्या दिवसास बळिप्रतिपदा ह्मणतात. या दिवसीं वामनाने बळीस पाताळीं घालून त्यास तेथील राज्य दिल्हें, ह्मणून हिंदूच्या बायका शेणाचा बळिराजा आंगणांत स्थापून त्याची पूजा करितात. परंतु हे करण्यापूर्वीं घरांतील सर्व केरकचरा एका टोपलींत जमाकरून त्यावर एक दिवटी एक पैसा व एक झाडू ठेवून ती टोपली चाकराच्या हातांत देतात. आणि एका मुला करवीं थाळी वाजवून "इडापिडा जावो आणि बळींचें राज्य येवो," असें ह्मणून तो कचरा उकीरड्यावर नेऊन टाकितात.

पांचव्या दिवसास यमद्वितीया ह्मणतात. ह्या दिवसीं यम आपली बहीण यमुना ईच्या घरीं गेला होता. ह्मणून

आतां बहिणी आपल्या भावास घरीं बोलावून त्यास आरती ओवाळून भोजन किंवा फळाहार घालितात.

यप्रमाणें दिवाळीच्या पांच दिवसांचें संक्षिप्त वर्णन आहे. याशिवाय दिवाळींत पुष्कळ दारू जाळतात, व शास्त्राज्ञेवरून जुगार खेळतात.

---

## सण १२.

### फाल्गुन मास– होळी.

हें पुढील होळीचें संक्षिप्त वर्णन, होळीविषयीं जे दोन ग्रंथ झाले आहेत, त्यापैकीं दुसऱ्यांतून घेतलें आहे.

"होळी दरसाल फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस पडती. या देशाच्या कांहीं प्रदेशीं सणास होळीच्या दिवसापासून आरंभ करितात व दुसऱ्या प्रदेशीं होळीच्या दिवसींच सणाचा अंत करितात. ज्या दिवसीं सायंकाळीं होळी पेटवितात, तो होळीचा दिवस ह्मणतात. त्याचे पुढचे किंवा मागचे चार दिवस धुळवाडीचे दिवस. आणि शेवटच्या दिवसास रंगपंचमी ह्मणतात. होळीचा सण ज्या दिवसांचीं नावें खालीं आहेत त्यांच्या अर्थाप्रमाणें होतो. पहिल्या दिवसीं होळी होती; दुसऱ्या दिवसापासून चवथ्या दिवसपर्यंत माती राख यांमध्यें लोक खेळतात; पांचवे दिवसीं रंग खेळतात, आणि पळसाच्या फुलाचें पिवळें पाणी किंवा श्रीमंत लोकांमध्यें केशराचें पाणी करून एकमेकाच्या आंगावर टाकतात.

"होळीचें मुळ पद्मपुराणांत लिहिलें आहे. तें असें कीं, धुंडा नामक एक राक्षसी शिवाचे वरें करून कोणास मानीनाशी झाली. तेव्हां तिचा वध करण्यास वसि-

ष्ठानें असी युक्ति योजिली कीं फाल्गुन शुद्ध पौर्णिमेच्या दिवसीं एक होळीकरून तिजमध्यें या राक्षसीची एक प्रतिमा टाकावी. आणि जळकीं लाकडें हातांत घेऊन मोठी ध्वनि करावी. आणि बिभित्सभाषणाने तिची निंदा करून मुलांनीं तिचा पाठलाग करावा ह्मणजे ती व्याकुळ होऊन आपला प्राण त्याग करील. मग वसिष्ठाच्या युक्तीप्रमाणेंच लोकानी केलें तेव्हां ती पिडा टळली. तेव्हांपासून होळी प्रचारांत पडली. याप्रमाणें होळीच्या मुळाची कथा आहे."

समाप्त.